





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २८.०१.२०२५ | अंक नं. २७७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020







# शेंडी येथील आयटी इंजिनियरला दोघांनी लावली १ कोटी १० लाख रुपयांना 'शेंडी'

**शेअर ट्रेडिंगमध्ये २० ते ३० टक्के नफ्याचे आमिष दाखवत केली फसवणूक**

नगर – एसएमसी ग्लोबल सिक्युरिटीज ही 'सेबी'कडे नोंदणीकृत कंपनी असल्याचे सांगत एका आयटी इंजिनियरला २० ते ३० टक्के नफ्याचे आमिष दाखवत मोबाईल पवरून शेअर ट्रेडिंग करण्यास भाग पाडले. या माध्यमातून १ कोटी १० लाख ८० हजार रुपये जमा झाल्यावर त्याला पवर व व्हॉट्स पवर ब्लॉक करून त्याची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. १२ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत ही घटना घडली. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात दोन व्हॉट्स प नंबरधारक अज्ञात व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आयटी इंजिनियर प्रविण अंबादास राऊत (वय ४२, रा. राऊत मळा, कृष्णा मंदिरामागे, शेंडी, ता. नगर) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांनी मोबाईल पवर आलेल्या जहिरतीवरून एसएमसी ग्लोबल सिक्युरिटीज कंपनीशी संपर्क साधला. त्यावेळी त्यांचे एका अनोळखी व्यक्ती सोबत व्हॉट्स पवर चॅटिंग सुरु झाले. तो मोबाईल धारक व त्याचा आणखी एक साथीदार यांनी फिर्यादी राऊत यांच्याशी वारंवार संपर्क साधत त्यांचा विश्वास संपादन केला. त्यांनी आपली संस्था ही सेबीकडे नोंदणीकृत संस्था असल्याचे कागदपत्र दाखवले.

कंपनीच्या पवरून शेअर ट्रेडिंग केल्यास जादा नफा मिळेल, असे अमिष दाखवून राऊत यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. त्यांच्या वर विश्वास ठेवून फिर्यादी राऊत यांनी महिनाभरात एकूण १ कोटी १० लाख ८० हजार रुपये कंपनीने दिलेल्या बँक खात्यावर जमा केले. मात्र त्यांना कुठलाही परतावा मिळाला नाही, त्यामुळे त्यांनी पैसे परत मागितले असता त्यांच्याकडेच या दोघांनी कमिशनची मागणी केली. त्यानंतर त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. काही दिवसांनी त्यांना पवर व व्हॉट्स पवर ब्लॉक करून त्यांच्याशी संपर्क बंद केला. अनेकदा संपर्क साधूनही तो होत नसल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले.

त्यानंतर त्यांनी २७ जानेवारीला नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी त्या दोन अनोळखी व्हॉट्स ॲप नंबर धारकांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (२) (४), ३१९ (२), माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (ड) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम हे करत आहेत.

**पाहिजेत**
टॅक्स अँड इन्व्हेस्टमेंट कन्सल्टन्सी फर्मसाठी मुले/मुली पाहिजे
7030832227




**विकणे/भाड्याने देणे**
शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी दुसऱ्या मजल्यावर २ बीएचके फ्लॅट भाड्याने देणे. मिसाळगल्ली, तेलीखुंट, पावरहाऊस
पाईपलाईन रोड, तुळजाभवानी मंदिरासमोर
कृष्णा आनंद कॉम्प्लेक्स या
नविन इमारतीत पहिल्या मजल्यावर, रोडलगत
१) कारपेट क्षेत्र ४४० स्क्वे. फुट विकणे किंवा भाड्याने देणे
२) कारपेट क्षेत्र १३५० स्क्वे. फुट भाड्याने देणे
ऑफिस, बँक, ओ.पी.डी. किंवा व्यवसायिक वापरासाठी
संपर्क : 8623963979

# हद्दपारी आदेशाचा भंग करून नगरमध्ये आलेल्या एकाला पकडले

नगर – शहरासह जिल्ह्यातून १ वर्षासाठी हद्दपार केलेला कुणाल महेंद्र पोटे (वय ३४, रा. प्रेमदान हडको) हा हद्दपारी आदेशाचा भंग करत नगर शहर परिसरात लपून छपून वास्तव्य करत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्याला तोफखाना पोलिसांच्या पथकाने २७ जानेवारीला प्रेमदान हडको परिसरातील मंदिराजवळ पकडून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबतची माहिती अशी की जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशाने जिल्ह्यातून एक वर्षाकरिता हद्दपार असलेला कुणाल पोटे हा प्रेमदान हडको परिसरात आल्याची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन त्याचा शोध घेतला असता कुणाल पोटे हा तेथे मिळून आला.

याप्रकरणी पो. कॉ. सतीश त्रिभुवन यांनी दिलेले फिर्यादीवरून त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## दिग्गजांची मांदियाळी - नाट्यरसिकांची दिवाळी

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन — संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१

कालच आपल्या अहिल्यानगरीत अ.भा. नाट्यपरिषदेच्या १०० व्या विभागीय नाट्यसंमेलनाचा पडदा संपन्नतेने पडला. नगरच्या नाट्यपरिषद व नाट्यकर्मींनी केवळ २० दिवसांत या संमेलनाचे शिवधनुष्य उचलून यशस्वी करून दाखवले. याबद्दल सर्वच पदाधिकारी, नाट्यरसिक व ज्ञात अज्ञात कार्यकर्त्यांचे मनापासून अभिनंदन.

अनेक नामवंत नाट्यअभिनेत्यांमुळे या संमेलनाने जणू नाट्यरसिकांची दिवाळीच झाली. मर्डरवाले कुलकर्णी, मोरुची मावशी या नाटकांनी मनमुराद करमणूक केली तर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, एकांकिका, १०० कलाकारांची नांदी, परिसंवाद, नाट्यदिंडी इ.मुळे रसिकांची भूक शमावली गेली.

आचता याच उत्साह, वातावरणाचा फायदा घेऊन नगरच्या पदाधिकाऱ्यांनी नाट्य चळवळ वाढवून जास्तीतजास्त नाट्यउपक्रम, स्पर्धा, नाटके आणून रसिक व नवीन नाट्यकर्मींची पिढी तयार करण्याचा प्रयत्न करावा. सावेडीतील नाट्यभवनाची पूर्तता करवून घेऊन तेथे व आत्ताच्या नाट्यगृहात महापालिका व शासन स्तरावरून सेवा, सुविधा, सवलती मिळवून घ्याव्यात. सध्याचे प्रसाद बेडेकरांच्या कल्पनेतून वर्षात ४-५ नाटके पाहण्याच्या योजनेला बळकटी द्यावी.



तात्पर्य, नगरकर रसिक आहे, दर्दी आहेत त्यांना एक सक्षम माध्यमाची गरज आहे. नगरच्या नाट्यपरिषदेच्या नव्या पिढीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी कालच्या यशस्वी संयोजनाने ती आशा वाढवली आहे. त्या सर्वांना पुनश्च धन्यवाद व शुभेच्छा! (मुसाफिर)

# बाजारपेठेत 'पे अ‍ॅण्ड पार्किंग'ची अंमलबजावणी करण्यात येवू नये

### बेकायदा अतिक्रमण करणाऱ्या प्रवृत्तींना व्यावसायिक वैतागले; भाजप पदाधिकाऱ्यांसह व्यापारी वर्गाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना निवेदन

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेने शहर व उपनगरात वाहनांसाठी पे अ‍ॅण्ड पार्क धोरण राबविण्याचे ठरवले आहे. यासाठी विविध जागाही निश्चित करून दरपत्रकही तयार करण्यात आलेले आहे. मात्र सदर निर्णयाची शहरातील मुख्य बाजारपेठेत अंमलबजावणी केल्यास बाजारपेठेतील अर्थकारणावर विपरित परिणाम होण्याची भीती आहे. आधीच व्यापारी, व्यावसायिक बाजारपेठेत काही बेकायदा अतिक्रमण करणाऱ्या प्रवृत्तींना वैतागले आहेत. त्यात नवीन पे अ‍ॅण्ड पार्क धोरण बाजारपेठ उद्ध्वस्त करणारे ठरेल. त्यामुळे सदर निर्णय रद्द करण्याचे आदेश देऊन अतिक्रमणांबाबतही लवकर कार्यवाही करावी अशी मागणी भाजप व वंदे मातरम् युवा प्रतिष्ठानच्या सदस्यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना निवेदन देऊन केली आहे.

यावेळी वंदे मातरम् युवा प्रतिष्ठानचे महावीर कांकरिया, भाजपचे सचिन पारखी, प्रशांत मुथा, व्यापारी महासंघाचे ईश्वर बोरा, तेजस डहाळे, प्रतीक बोगावत, पवन इथानी, भैय्या भांडेकर, दीपक देहरेकर आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, कापडबाजार, दाळमंडई, आडतेबाजार, गंजबाजार, सराफबाजार, नवीपेठ, शहाजी रोड या परिसरात शहरासह जिल्ह्यातून ग्राहक खरेदीसाठी येत असतात. मुळातच या परिसरात वाहतूक कोंडीची समस्या आहे. अतिक्रमणांची समस्या आहे. आधीच ग्राहक बाजारपेठेत येताना त्रस्त असतात. त्यात आता वाहन लावण्यासाठी पैसे मोजायचे असा भुर्दंड ग्राहक सहन करणार नाहीत. त्याचा परिणाम बाजारपेठेतील व्यावसायिक, व्यापारी, दुकानदारांच्या व्यवसायावर होवू शकतो. आधीच अनेक व्यापारी, दुकानदारांनी उपनगरांमध्ये आपापली दुकाने स्थलांतरीत केली आहेत. मोठ मोठे शोरूम, मॉल्स सावेडी, केडगाव उपनगरांत उभे राहिले आहेत. त्यामुळे बाजारपेठेतील ग्राहक आधीच कमी झालेला आहे. जिल्ह्यातील ग्राहकांना शहरातील मुख्य बाजारपेठ जवळ पडत असल्याने ग्राहक येतात. पे अ‍ॅण्ड पार्कमुळे ग्राहकांना वाहन लावण्यासाठी तासाला पैसे द्यावे लागणार आहेत. यातून मोठा भुर्दंड ग्राहकांच्या खिशाला बसेल. महापालिका प्रशासनाने व्यापारी वर्गाशी चर्चा करून असा महत्वाचा निर्णय घेणे अपेक्षित होते. त्यामुळे शहरातील बाजारपेठ वाचविण्यासाठी मनपा प्रशासनाने निदान बाजारपेठेत तरी पे अ‍ॅण्ड पार्क धोरणाची अंमलबजावणी करू नये. अतिक्रमणाच्या गंभीर प्रश्नावरून व्यापारी वर्गाला दादागिरी, मारहाणीचे प्रकार घडतात. त्यालाही पायबंद बसवावा असे निवेदनात म्हटले आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या विषयाची तातडीने दखल घेत महानगरपालिकेसह संबंधितांना सूचना दिल्याचे महावीर कांकरिया यांनी सांगितले.

## अभाविपच्या 'सील टूर यात्रा' समितीच्या स्वागताध्यक्षपदी डॉ. सुजय विखे यांची नियुक्ती



नगर - अभाविपची सील टूर यात्रा अहिल्यानगर येथे येणार असून याच्या स्वागत समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. सुजय विखे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर उपाध्यक्ष ज्येष्ठ उद्योजक अरविंद पारगावकर असणार आहेत. तसेच स्वागत समिती सदस्य म्हणून स्नेहालयचे गिरीश कुलकर्णी, सचिन पारखी, दिलीप तलरेजा, दत्ता गाडळकर, धनंजय जाधव, सुरेश लालबागे, सुरज अग्रवाल, उदय कराळे, निलेश यंगंदुल, ईश्वर बोरा, प्रफुल्ल नातू हे कार्य करणार आहेत.

२९ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान ही यात्रा अहिल्यानगर शहरामध्ये दाखल होणार आहे. ही यात्रा २९ जानेवारी रोजी अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवर या विद्यार्थ्यांचे स्वागत केले जाईल. येणारे २६ विविध कुटुंबांमध्ये राहायला जाणार असून या कुटुंबांमध्ये राहून आपली संस्कृती अनुभूती घेणार आहेत, अशी माहिती स्वागत समिती सचिव अमोल घोलप यांनी दिली.

तसेच या विद्यार्थ्यांचे विविध महाविद्यालयात कार्यक्रम होणार असून या मधून कॉलेजमध्ये राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांचे बीजारोपण होईल असा विश्वास अभाविप प्रदेश मंत्री अथर्व कुलकर्णी यांनी व्यक्त केला. ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सहकार सभागृह येथे करण्यात आली असल्याची माहिती यात्रा प्रमुख रोहीत आसने यांनी दिली.

यावेळी महानगर मंत्री आनंद गांधी, अनुष्का निंबाळकर उपस्थित होते.

## कायनेटिक चौकातील दारू अड्ड्यावर छापा

नगर -बेकायदेशीररित्या दारूची विक्री सुरु असलेल्या अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी छापा टाकून एकास ताब्यात घेतले. त्याच्याकडून ४ हजार ९५ रुपये किमतीची दारू जप्त केली. ही कारवाई नगर पुणे रोडवरील कायनेटिक चौक येथील देशमुख लॉ कॉलेज समोर २७ जानेवारी रोजी करण्यात आली.

कायनेटिक चौकात लॉ कॉलेज समोर दारू विक्री सुरू असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे त्या दारू अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला. त्याठिकाणी गणेश मच्छिंद्र वंजारे (वय ३६, रा. अरणगाव रोड, अ.नगर) यास पकडून त्याच्याकडील विविध कंपनीची ४ हजार ९५ रुपये किमतीचा दारू जप्त केली. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी पो. कॉ. सुरज कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वंजारे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ प्रमाणे गुन्हा दाखल केला.

# मालमत्ता करावरील शास्तीमध्ये १०० टक्के सवलत घेण्यासाठी ३ दिवस शिल्लक; महानगरपालिका जप्ती कारवाई तीव्र करणार

### जप्तीच्या नोटिसा बजावण्यास सुरुवात; थकबाकीदार मालमत्ताधारकांनी सवलतीचा लाभ घेऊन तात्काळ कर भरावा : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे



नगर - महानगरपालिकेने मालमत्ता कर व पाणीपट्टीच्या थकबाकी वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. थकबाकीदार मालमत्ताधारकांना जानेवारी अखेरपर्यंत शास्तीमध्ये १०० टक्के सवलत देण्यात आलेली आहे. आत्तापर्यंत सुमारे ४७०० थकबाकीदारांनी याचा लाभ घेतला असून त्या माध्यमातून ४.६० कोटींची वसुली झालेली आहे. थकबाकीदारांकडून थंड प्रतिसाद असल्याने महानगरपालिकेने जप्ती कारवाई सुरू केली आहे. शास्तीमध्ये १०० टक्के सवलत घेण्यासाठी अखेरचे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे थकबाकीदार मालमत्ताधारकांनी सवलतीचा लाभ घेऊन तात्काळ थकीत कराचा भरणा करावा व जप्तीची कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासन यशवंत डांगे यांनी केले आहे.

मनपा प्रशासनाने ८ जानेवारी पासून ३१ जानेवारी पर्यंत मालमत्ता करा वरील शास्तीमध्ये शंभर टक्के सवलत दिलेली आहे या काळात ८.१८ कोटींची वसुली झाली आहे. त्यातील ३.५८ कोटी रुपये शास्ती माफ करण्यात आली असून, ४.६० कोटी रुपये वसूल झाले आहेत. केडगाव येथील मनपाच्या भाग्योदय शॉपिंग सेंटर येथील गाळेधारकांचे १५.५० लाख रुपये थकीत गाळे भाडे वसूल झाले आहे. अद्यापही २०६ कोटींची थकबाकी आहे. सुमारे ७५ हजार थकबाकीदारांनी कर भरलेला नाही. शास्तीमध्ये १०० टक्के सवलत घेण्यासाठी अखेरचे तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. थकबाकीदारांकडून थंड प्रतिसाद मिळत असल्याने जप्तीची मोहीम हाती घेतली आहे.

झेंडीगेट प्रभाग समिती कार्यालय अंतर्गत असलेल्या थकबाकीदारांकडून अत्यल्प प्रतिसाद मिळालेला आहे. या प्रभागातील वसुली अत्यंत कमी आहे. त्यामुळे थकबाकीदारांना जप्तीच्या नोटीस बजावण्यास सुरुवात करण्यात आली आहे. थकबाकीदार मालमत्ताधरकांनी शास्तीमध्ये १०० टक्के सवलत घेण्यासाठी अखेरचे तीन दिवस शिल्लक राहिले असल्याने तात्काळ सवलत घेऊन थकीत कराचा भरणा करावा, अन्यथा कारवाई करण्यात येईल असा इशारा यशवंत डांगे यांनी दिला आहे.

# नगर शहरातील प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे बारावी, दहावी परीक्षेला विद्यार्थ्यांना फटका बसणार

### विद्यार्थी परीक्षेला मुकाल्यास आयुक्त, जिल्हाधिकारी यांना जबाबदार धरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नितीन भुतारे यांची मागणी

नगर - गेल्या आठ महिन्यापासून नगर शहरांमध्ये रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहे, त्याची सर्वत्र दुरावस्था पाहता आज १२ वी व १० वीच्या मुलांच्या परीक्षेत तोंडावर आले असताना या ठिकाणी त्यांना परीक्षेला जाता येईल की नाही अशी अवस्था झाली आहे. जर उद्या कोणी परीक्षेस मुकले तर याला जबाबदार नगरचे जिल्हाधिकारी व महानगरपालिकेचे प्रशासन राहतील असा इशारा नितीन भुतारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनामध्ये केला आहे.

नगर शहरामध्ये राज्य शासनाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परिक्षेत्रात साधारणतः ८४ कोटी रुपयांचा निधी राज्य सरकारच्या यांच्या माध्यमातून उपलब्ध करून दिला आहे. यामध्ये रस्ते, ड्रेनेज, गटारीची कामे, वॉल कंपाऊंड असे वेगवेगळे चे विषय व उद्याने हा विषय घेण्यात आलेला आहे. ११४ कामे यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. आतापर्यंत केवळ ४० ते ४५ टक्के कामे पूर्ण झाले आहे. असे महापालिकेने कळवले आहे.



सध्या या कामाची दुरावस्था पाहता सर्वत्र धुळीचे साम्राज्य झालेले आहे, कुठेही पोलीस खात्याचा माणूस किंवा महानगरपालिकेच्या प्रशासनाचा माणूस या कामावर नजर ठेवून आहे असे कुठेही दिसून येत नाही. आजही खोदलेल्या रस्त्यांमुळे परीक्षेच्या अनेक केंद्राच्या ठिकाणी तसेच जवळपास रस्ते अरुंद झाले आहेत त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक समस्या या नगर शहरांमध्ये निर्माण झाल्यामुळे ट्रॅफिक जाम होते व तासनतास अडकून राहावे लागत आहे. विशेष म्हणजे नगर शहरांमध्ये रस्ते अतिशय अरुंद आहेत त्यामुळे या ठिकाणी असणारा शाळा महाविद्यालयांची अवस्था पाहता सध्या इयत्ता १२वी व १०वीची परीक्षा ही सुरू झालेली आहे. विशेष म्हणजे त्या प्रॅक्टिकलच्या परीक्षा या आता संपत आलेल्या आहे. महत्त्वाच्या परीक्षा आता लवकरच सुरू होणार असल्यामुळे आज शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची समस्या निर्माण होणार आहे. ट्रॅफिक जाममुळे विद्यार्थ्याला परीक्षेला उशीर झाला तर तो परीक्षेला मुकण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही. वास्तविक पाहता राज्य सरकारने या परीक्षेच्या काळामध्ये रस्ते खुले करून द्यावे अशा प्रकारचे अध्यादेश या अगोदरच दिलेले आहे, त्याची अंमलबजावतो होणार नाहीच पण आता उद्या या परीक्षेला मुलांना जाता येईल की नाही अशी अवस्था झाली आहे. चार दिवसापूर्वी तीन विद्यार्थ्यांना या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये दुखापत झाली आहे, अशी सर्व अवस्था पाहता याला जबाबदार येथील प्रशासन नाही का असा सवाल जनते मध्ये आहे. त्यामुळे ताबडतोप अहिल्यानगर मधील प्रशासनाने आयुक्त, जिल्हाधिकारी यांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेऊन उपाय योजना कराव्यात. जर उपाययोजना केल्या नाही विद्यार्थ्याला परीक्षेला उशीर झाला. अपघात झाला तर याला जबाबदार महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांना धरावे अशी मागणी नितीन भुतारे यांनी केली.

# अल्पवयीन मुलीचा वारंवार पाठलाग करून छेड काढणाऱ्याविरोधात 'पोक्सो'चा गुन्हा

नगर - नगर जामखेड रोड वरील एका महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या पाथर्डी तालुक्यातील १७ वर्षीय मुलीचा वारंवार पाठलाग करत तिची छेडछाड करणाऱ्या तरुणावर नगर तालुका पोलिसांनी विनयभंगासह बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार (पोक्सो) गुन्हा दाखल केला आहे. मनीष सुनिल लबडे (रा.पाथर्डी) असे या आरोपीचे नाव आहे.

पाथर्डी तालुक्यातील एका गावात राहणारी अल्पवयीन मुलगी नगर जामखेड रोड वरील एका अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. ती महाविद्यालयाजवळच असलेल्या मुलींच्या होस्टेल मध्ये राहते. आरोपी मनीष लबडे हा गेल्या अनेक दिवसांपासून त्या मुलीला त्रास देत होता. तू मला खूप आवडतेस, माझ्याशी बोल, मला फोन करत जा, असे म्हणून तो तिला त्रास द्यायचा. तिचा वारंवार पाठलाग करायचा. इतकेच नव्हे तर त्याने तिच्याच महाविद्यालयात प्रवेशही घेतला होता. त्याच्या कडून होणाऱ्या त्रासाबाबत सदर मुलीने तिच्या वडिलांना माहिती दिली होती. तिच्या वडिलांसह इतर नातेवाईकांनी मनीष लबडे व त्याच्या कुटुंबियांची भेट घेवून त्यास समजून सांगितले होते.

तरीही त्याचे त्रास देणे सुरूच होते. नोव्हेंबर २०२४ मध्ये तर तू कॉलेज मधील इतर मुलांशी का बोलतेस असे म्हणून त्याने तिला मारहाणही केली होती. त्यावेळी ही मुलीच्या नातेवाईकांनी त्याला समज दिली होती. असे असताना २७ जानेवारी रोजी दुपारी १२ च्या सुमारास लबडे हा महाविद्यालय परिसरात तोंड बांधून आला व त्याने त्या मुलीचा पाठलाग करत पुन्हा तिची छेड काढली. हा प्रकार मुलीने तिच्या वडिलांना सांगितला. तिचे वडील व इतर नातेवाईक तातडीने नगरला आले.

त्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात जावून सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते यांची भेट घेत घडलेला प्रकार सांगितला. स.पो.नि. गिते यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आणि त्या आरोपीकडून वारंवार त्रास दिला जात असल्याने सदर मुलीची फिर्याद नोंदवून घेत आरोपी मनीष लबडे याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७८, ११५, सह पोक्सोचे कलम ११ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### मुलींनो त्रास सहन न करता अशा प्रवृत्तींना धडा शिकवा : स.पो.नि. प्रल्हाद गिते

महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या छेडछाडीच्या घटना वारंवार होत आहेत. बऱ्याच वेळा मुली भयभीत होवून असे प्रकार कुटुंबियांना सांगत नाहीत. प्रतिकारही करत नाहीत. त्यामुळे त्रास देणाऱ्या रोड रोमिओंचे धाडस वाढत जाते आणि ते आणखी त्रास देतात. त्यामुळे जर कोणी तुम्हाला त्रास देत असेल, वाईट हेतूने वारंवार पाठलाग करत असेल तर तुम्ही न घाबरता तक्रार देण्यासाठी पुढे या, आपल्या शिक्षकांना, पालकांना याची माहिती द्या. त्यांनी समज देवूनही त्रास बंद झाला नाही तर पोलिसांकडे या. पण घाबरून गप्प बसू नका, अशा प्रवृत्तींना वेळीच धडा शिकवला पाहिजे, त्यासाठी नगर तालुका पोलिस तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी मुलींना केले आहे.

## मोपेडला धडक देऊन अनोळखी इसमांकडून तिघांना मारहाण

नगर - पाठीमागून आलेल्या मोपेडस्वाराने ओव्हरटेक करून दिलेल्या धडकेत मोपेडवरील दोघे खाली पडले असता अनोळखी इसमाने त्यांना शिवीगाळ करीत बेदम मारहाण केली. यावेळी भांडण सोडवण्याकरता आलेल्या एकास धारदार वस्तूने मारून दुखापत केल्याची घटना बालिकाश्रम रोडवरील महालक्ष्मी उद्यान समोर २७ जानेवारी रोजी घडली.

याबाबतची माहिती अशी की निखिल अंबादास इप्पलपेल्ली (वय २५, रा. शुभवास्तू अपार्टमेंट, गंगा बिल्डिंग, लिंकरोड, अ,नगर) हा त्याच्या बहिणी बरोबर त्यांची मोपेड (क्र. एम एच १२ एन एच ४३२५) ने बालिकाश्रम रोडने जात असता पाठीमागून वेगात आलेल्या मोपेड (क्र. एम एच १६ सी एक्स ४०८) वरील दोन अनोळखी इसमाने त्यांना ओव्हरटेक केले असता त्यांच्या मोपेडचा धक्का लागून भाऊ बहीण खाली रस्त्यावर पडले. त्या दोघांनी अचानक शिवीगाळ करून त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी निखिल इप्पलपेल्ली याचा मित्र ओम थदानी भांडण सोडवण्याकरता मध्ये आला. त्यावेळी इप्पलपेल्ली हा भीतीने शेजारी असलेल्या गिफ्टच्या दुकानात शिरला असता दोन अनोळखी इसमाने त्या दोघांना दुकानात शिरुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर मारहाण करणारे दोघे घटनास्थळावरून निघून गेले.या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी निखिल इप्पलपिल्ले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## नवलमल भंडारी यांचे संथाराव्रतात निर्वाण



नगर - आश्वी येथील नवलमल रतनचंद भंडारी (वय ८९) यांचे २८ जानेवारी रोजी संथाराव्रतात निर्वाण झाले. त्यांच्यावर आश्वी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. आश्वी येथील संतोष भंडारी यांचे ते वडील होत तर सुशील भंडारी यांचे चुलते होत.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन

नगर - भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयामार्फत देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या निवारणासाठी 'एल्डर लाईन १४५६७' ही टोल फ्री हेल्पलाईन सर्व राज्यात सुरू करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांनी या सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार यांनी केले आहे.

सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (NISD), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यामध्ये ज्येष्ठांसाठीची ही राष्ट्रीय हेल्पलाईन जनसेवा फाऊंडेशनद्वारे चालवली जात आहे. भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक विश्वासार्ह राष्ट्रीय हेल्पलाइन तयार करून ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणे तसेच अत्याचार ग्रस्त वृद्ध व्यक्तींची काळजी घेणे हा यामागचा याचा उद्देश आहे.



**पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा भारतीय जनता पार्टी तर्फे सत्कार**

भारतीय जनता पार्टी, वकील आघाडीच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी वकील आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड. चंदन बारटक्के, अ‍ॅड. संदीप काळे, अ‍ॅड. देवेंद्र बंब आदी उपस्थितीत होते.

# गृहिणी

## आरोग्य

### राखा डोळ्यांचे आरोग्य

अंजीरमध्ये व्हिटॅमिन ए असते जे डोळ्यांच्या आरोग्यासाठी खूप महत्वाचे आहे. हे दृष्टी सुधारण्यास मदत करते आणि मोतीबिंदूचा धोका कमी करते. अंजीरमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

## पाककला

### लिंबू-आल्याचे लोणचे

**साहित्य :** लिंबू - आठ, हिरव्या मिरच्या - १०० ग्रॅम, आले - ५० ग्रॅम, लोणचे मसाला - दोन चमचे, ओवा - एक टीस्पून, काळे तीळ - एक टीस्पून, हळद - एक टीस्पून, काश्मिरी मिरची - एक टीस्पून, हिंग - अर्धा टीस्पून, मीठ - दोन चमचे, काळे मीठ - एक टीस्पून, लिंबाचा रस - दोन चमचे

**कृती :** सर्वात पहिले लिंबू, आले आणि मिरच्या स्वच्छ धुवून वाळवून घ्या. आता आले सोलून घ्यावे. तसेच हिरवी मिरची, आले आणि लिंबू कापून घ्या. आता एका काचेच्या बरणीत चिरलेला लिंबू, मिरची आणि आले घालावे. नंतर वरील सर्व मसाले घालून हलवून घ्यावे. तसेच मीठ, लिंबाचा रस घालावा आणि चांगले मिसळा. मग ते दोन ते तीन दिवस ही बरणी उन्हात ठेवा.

## सौंदर्य

### चेहऱ्याला तुपाने करा मसाज

* त्वचेचा कोरडेपणा कमी करण्यासाठी चेहऱ्याला तुपाने मसाज केल्यास चेहऱ्याचा हरवलेला ओलावा परत मिळण्यास मदत होते. एवढेच नाही तर डोक्याला तुपाने मसाज करणे केसांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. तुपाने डोक्याला मसाज केल्याने केस दाट आणि चमकदार होण्यास मदत होते.

* शुद्ध देशी तुपाचा एक थेंब डोळ्यां मध्ये टाकल्याने जळजळ, वेदना इत्यादी दूर होतात आणि दृष्टी वाढते.

## सल्ला

डाळी किंवा कडधान्य शिजवताना त्यामध्ये थोडे मीठ एक चमचा तेल आणि हळद टाकली की कडधान्य छान मऊसर शिजतात.

## वास्तू

वरचा मजला मूळ घराच्या नैऋत्य दिशेत असणे सर्वाधिक उत्तम. त्या खालोखाल अनुक्रमे आग्नेय व वायव्य दिशेत असणे चांगले, परंतु नैऋत्य बरोबर असणे अत्यावश्यक असते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २९ जानेवारी २०२५

**दर्श अमावास्या, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, पौष कृष्णपक्ष, उ.षा.०८।२१, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. शत्रू पराजित होईल. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहाणार नाही.

**वृषभ :** निर्णय घेण्यापूर्वी सारखा विचार केल्याने नुकसान होईल. रोख रकमेची मोठी देवघेव होईल.

**मिथुन :** प्रेमसंबंधांमध्ये आवश्यक प्रगती होईल. आपल्या धाडसात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** प्रसिद्धी वाढण्याची शक्यता आहे. आपले धाडस वाढेल. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. मागील उधारी वसुल होईल.

**सिंह :** कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देण्यामुळे नुकसान होईल.

**कन्या :** आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. धनाच्या रुपात यश मिळवाल. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवाल.

**तूळ :** अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील.

**वृश्चिक :** कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा पण घाई करू नका. वाहने व उपकरणे बिघडण्याच संभव आहे.

**धनु :** वेळ अनुकूल आहे. कामांमध्ये प्रगती होईल. आरोग्य उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील.

**मकर :** काही प्रेमपूर्ण अनुभव आज येऊ शकतात. बराच वेळ एखादे काम करण्यात वाया जाईल.

**कुंभ :** इतर लोकांना आपले मत पटवून देण्यात यशस्वी व्हाल.

**मीन :** हुशारीने गुंतवलेले धन आपला फायदा करुन देईल. मागील उधारी वसुल होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# हसा आणि शतायुषी व्हा!

### बक्षीस

अर्चना पहिलीत शिकत होती. चित्रकलेची स्पर्धा झाली, तिला पहिले बक्षीस मिळाले. बक्षीस विजेत्या चित्रांचे प्रदर्शन भरवले होते. ते पाहण्यास पालकांना निमंत्रण होते. अर्चनाची आई ते पाहण्यासाठी आली. आईला पाहताच अर्चना धावत आली व एकदम म्हणाली. 'आई तू मला काढून दिलेल्या चित्राला पहिलं बक्षीस मिळाले बरं का. !


# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०२२ रोजी किती शहरांमध्ये फाईव्ही-जी सेवा सुरू केली? - २३ शहरात

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# शब्दगंध क्र. ७१०२

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१०१ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) सोपे नसलेले; कठीण ४) आकाशात उंच उडणारा एक पक्षी ६) सोंगट्या, बुद्धिबळ वगैरे ज्यावर खेळतात ते विशिष्ट आकाराचे कापड ७) नुसते बोलणारा १०) एक मराठी आडनाव ११) दृष्टी १३) कोंब; अंकुर; पराभव १५) जळजळ १६) दणकट; कणखर १९) एक पक्षी २१) श्रीमंत; धनवान २२) रानटी; जंगली; वन्य

**उभे शब्द :-** १) अवमान; मानखंडना; पाणउतारा २) एक वृक्ष; वडाचे झाड ३) आयते व अचानक मिळालेले धन; घबाड ४) आघात; वार; जखम ५) अनेकांचे एकदम रडणे; आक्रोश ८) पक्षघात; अर्धांगवायू ९) विळखा ; वेढा; घेराव; परीघ १०) झाडाखालचा ओटा; पलीकडे १२) नजीक; समीप १३) हवेहवेसे वाटणे; आकर्षण १४) नव्वद अंशाचा कोन १५) दान करणारा १६) काख १७) केर; गदळ १८) सावट; छाया २०) नाद; आवाज; ध्वनी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** लोक आपल्याबद्दल चांगले ऐकल्यावर संशय घेतात वाईट ऐकल्यावर मात्र चट्कन विश्वास ठेवतात.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## रेशीम कसे तयार होते?

अत्यंत तलम आणि सुळसुळीत असे कापड दिसले की, आपण झटकन म्हणतो, 'रेशीम दिसतंय!' रेशमी कापडाला आजच्या कृत्रिम धाग्यांच्या जमान्यातही भरपूर वाव आहे हेच यावरून सिद्ध होते. 'रेशीम' या विषयाबद्दल अनेक आख्यायिका आहेत. तुतीच्या झाडाखाली चहा पीत बसलेल्या चिनी राजकन्येच्या चहात रेशमी किड्याचा कोश पडला आणि तिने तो कोश काढायचा प्रयत्न केला तेव्हा तिच्या हातात रेशमी धागा आला; ही त्यातलीच एक कथा.

किड्यांच्या कोशापासून रेशीम मिळते. त्यांची फुलपाखरं किंवा पतंग झाले की, या कोशांचा काही उपयोग नसतो हे चिनी लोकांना सुमारे ५००० वर्षांपूर्वी माहीत होते. चिनी लोकांनी ही माहिती अतिशय गुप्त ठेवली होती. रेशीम चीनच्या बाहेर कसे पडले याबद्दलही खूप आख्यायिका आहेत. त्यांतल्या एका आख्यायिकेप्रमाणे दोन भारतीय व्यापारी बुद्धभिक्षूंचा वेश घेऊन चीनमध्ये गेले आणि त्यांनी ही रेशमी कला चोरली. काही जणांच्या मते ही कला आधी कोरियात व नंतर चीनमध्ये गेली. ते काहीही असो, रेशीम जगभर लोकप्रिय झाले हे खरे. रेशमाची अळी तुतीची पाने खाऊन रूपांतरणापूर्वी कोश तयार करते. चीन, जपान, भारत, फ्रान्स, रशिया आणि इटली हे देश रेशीम उत्पादनात आघाडीवर आहेत. या देशातले रेशीम उत्पादक रेशमाचे किडे पाळतात. उन्हाळ्याच्या सुरुवातीला या किड्यांच्या माद्या अंडी घालतात. एक मादी साधारणपणे ५०० अंडी घालते. दहा दिवसांनी या अंड्यांतून अळ्या बाहेर पडतात. या अळ्यांतल्या निरोगी अळ्या जिवंत ठेवल्या जातात. या अळ्या तुतीच्या पानांवर वाढतात. साधारणपणे २५ दिवसांनी या अळ्या आपल्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या रसाद्वारे कोश तयार करू लागतात. हे कोश उकळत्या पाण्यात बुडवून किडे मारले जातात आणि रेशमी धागा काढला जातो. एका कोशापासून १५०० ते ५००० फूट लांबीचा धागा मिळतो. हा धागा त्याच जाडीच्या पोलादी तारेइतका बळकट असतो. रेशमाप्रमाणेच भारतात टसर हा कमी प्रतीचा कीटकजन्य धाबा निर्माण होतो.

## बेईमानी

एकदा एक व्यक्ती नोकरीची विनंती घेऊन सम्राट अकबराच्या दरबारात पोहचला. त्याचे म्हणणे ऐकून आणि त्याच्या बुद्धिमत्तेची चाचणी घेतल्यानंतर राजाने त्याला कर संकलन अधिकारी बनवले. आता त्या दरबारात बिरबलही उपस्थित होता. काही वेळ त्याचे बारकाईने निरीक्षण केल्यावर तो म्हणाला, ''राजा, हा माणूस खूप धूर्त वाटतो. तो लवकरच काहीतरी धोका नक्कीच करेल.'' काही काळ गेला आणि तोपर्यंत त्या व्यक्तीने कर गोळा करण्याचे काम पूर्णपणे हाती घेतले होते.

तसेच एके दिवशी एक-दोन लोक त्या अधिकाऱ्याची तक्रार घेऊन बादशाह अकबराकडे आले. त्या तक्रारी किरकोळ होत्या, त्यामुळे त्यांच्याकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. त्यानंतर लाच घेणे, जनतेला त्रास देणे असे आरोपही त्या अधिकाऱ्यावर होऊ लागले. आता इतक्या तक्रारी आल्यानंतर राजाने त्यांची अशा ठिकाणी बदली करण्याचा निर्णय घेतला जिथे त्याला अप्रामाणिकपणाची संधी मिळणार नाही. असा विचार करून राजाने ठरवले की त्याला मुन्शी बनवायचे. तेव्हा अकबर मनात म्हणाला आता घोड्याचे शेण उचलण्याच्या कामात तो कोणता बेईमानी करू शकणार आहे. तेथे मुन्शी पदावर पोहोचताच त्या व्यक्तीने पुन्हा लाच घेण्यास सुरुवात केली. तुम्ही घोड्यांना कमी धान्य आणि पाणी घालता, असे त्यांनी थेट घोड्यांच्या काळजीवाहूंना सांगितले. राजाला ही गोष्ट कळली म्हणून त्याने मला शेणाचे वजन करायला पाठवले. आता शेणाचे वजन कमी झाले तर राजाकडे तक्रार करेन. अशा प्रकारे त्या कारकुनावर नाराज होऊन लोक त्याला प्रत्येक घोड्यामागे एक रुपया देऊ लागले. तसेच ही बातमी अकबरापर्यंत पोहोचली. यमुनेच्या लाटा मोजण्याचे काम त्यांनी थेट त्याच्यावर सोपवले. तेव्हा राजाला वाटले की आता इथे कोणीही बेईमानी करू शकणार नाही.

काही दिवसांतच ती व्यक्ती यमुनेच्या काठी पोहोचताच त्याने तिथेही तो बोटीतील स्वारांना थांबवून लाटा मोजत असल्याचे सांगत असे. अशा स्थितीत तुम्ही लोक येथून जाऊ शकत नाही. दोन-तीन दिवस याच ठिकाणी राहावे लागेल. अशा गोष्टी रोज ऐकून बोटवाल्यांनी त्यांना काम सुरू ठेवण्यासाठी प्रत्येकी दहा रुपयांची लाच देण्यास सुरुवात केली. आता ती व्यक्ती यमुनेच्या काठावरही खूप अप्रामाणिक वागू लागली होती. एक-दोन महिन्यांत ही बातमी राजापर्यंत पोहोचली. मग अकबराने लेखी हुकूम पाठवला. ती व्यक्ती हुशार होती आणि त्याने नौका थांबवा, त्यांना जाऊ देऊ नका असा राजाचा आदेश असलेले पत्र बदलले होते. शेवटी त्याला कंटाळून राजाने त्याला नोकरीवरून काढून टाकले. तेव्हा राजाला बिरबलाचे शब्द आठवले की हा माणूस नक्कीच बेईमानी करेल. तेव्हा त्याला वाटले की त्याच्या पहिल्या चुकीसाठी मी त्याला कठोर शिक्षा करायला हवी होती.

तात्पर्य : अप्रामाणिक व्यक्ती कधीही त्याचा स्वभाव सोडत नाही.

# रहमते दर्शन (भाग - १)



## मेरे मेहेरबान

नामदान से पहले मेरी देवी-देवताओं और तीर्थ स्थानों में गहरी आस्था थी। मैंने परमात्मा की खोज के लिए कई तीर्थस्थानों की यात्रायें कीं और व्रत आदि रखे, लेकिन कुछ भी प्राप्त नहीं हुआ । सौभाग्यवश वह दिन भी आ पहुँचा जब मुझे दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज से दीक्षा मिली। दीक्षा के पश्चात भी तीर्थ स्थानों और देवी-देवताओं में मेरी आस्था कम नहीं हुई। मैं विभिन्न तीर्थ स्थानों पर पूर्ववत भ्रमण करता रहा। लेकिन मन को चैन नहीं था। इस तरह एक बार तीर्थ यात्रा के बाद मैं आश्रम में सत्संग के लिए गया। सत्संग में महाराज जी ने फ़रमाया, जो लोग गुरु को छोड़कर तीर्थस्थानों आदि में भटकते फिरते हैं उन्हें जीवन में कुछ भी प्राप्त नहीं होता। मैंने सत्संग सुना और गुरु का विश्वास प्राप्त करने की प्रबल इच्छा लेकर घर चला आया। उन दिनों मैं दिल्ली में एक टैंट हाऊस में नौकरी करता था। एक रात मैंने स्वप्न में देखा कि बहुत सी प्रेतात्माएँ मुझे डरा रही हैं और बहुत से लोग मुझे मारने के लिए आ रहे हैं। वैसे भी इससे पहले मेरे बहुत से दुश्मन हो गये थे। मैं बहुत घबराया हुआ था और मैं आश्रम में पहुँचा और महाराज जी को स्पप्न की सारी बात बता दी। महाराज जी ने बड़े प्यार से मुझसे पूछा, क्या तुमने नामदान लिया हुआ है? मैंने कहा, जी हाँ। महाराज जी ने कहा, घबराओ नहीं, सब ठीक हो जायेगा। तुम्हारा कोई कुछ नहीं बिगाड़ सकता क्योंकि तुमने नामदान लिया हुआ है। नाम जपते रहा करो। महाराज जी के इन प्यार भरे वचनों ने मुझ पर जादू की तरह काम किया और धीरे-धीरे मेरी सब समस्यायें हल होती चली गयीं। कुछ समय उपरांत मुझे लगने लगा कि जीवन में मैं अत्यंत सुखी हूँ। मुझे किसी प्रकार की मानसिक वेदना नहीं रही और मेरी आस्था दिन-प्रतिदिन गुरु के चरणों में बढ़ती चली गई। ऐसे थे सतगुरु, दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज, जिनके प्यार भरे वचन हमारे लिए घाव पर मरहम का काम करते थे। धन्य हैं वे जीव जिनको मनुष्य जीवन मिला और उसमें दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज जैसे पूर्ण महात्मा का संग प्राप्त हुआ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## दिमाग की शक्ती

आप अष्ट रत्नो में आना चाहते हैं, आप कुछ मास या कुछ वर्ष अभ्यास करते हैं, इस से कुछ होता नहीं, फिर अभ्यास छोड़ देते हैं। ज्यादातर भाई बहिनें स्थूल सेवा में लगे रहते हैं। अगर आप अष्ट रत्नो में आना चाहते हैं तो ज्ञान, योग, सेवा और सेहत का सन्तुलन रखें और १० हजार घंटे इस में लगाए तब जा कर योग विशेषज्ञ बनेगें और अष्ट रत्न बनने के लिये जीवन भर अभ्यास करना होगा। निरन्तर योगी बनना है तो भगवान के महावाक्य हर पल याद रखो। मानसिक विकास और लोगों का असर हम उन पांच लोगों का सम्मलित औसत बन जाते हैं, जिन लोगों के साथ हम सब से ज्यादा रहते हैं। हम उसी तरह खाने लगते हैं जिस तरह वह खाते हैं। हम उसी तरह बातें करते हैं, जिस तरह वे बातें करते हैं। उसी तरह पढ़ने लगते हैं, जिस तरह वे पढ़ते हैं। उसी तरह सोचने लगते हैं, जिस तरह वे सोचते हैं। वही देखने लगते हैं, जो वह देखते हैं। वैसी ही पोशाक पहनने लगते हैं, जैसी वह पहनते हैं। उसी तरह दयालु बनने लगते हैं जैसे वह हैं। उसी तरह व्यवहार करते हैं जैसे वह हैं। उसी तरह वफादार बनने लगते हैं जैसे वह हैं। उसी तरह गुणवान बनने लगते हैं जैसे वह हैं। इस बारे में सोचें कि आप सब से ज्यादा समय किस के साथ बिता रहे हैं, क्योंकि वह जिधर जा रहे हैं, उसी तरफ आप भी जा रहे हैं। अगर आप के आस पास अच्छे लोग नहीं हैं तो आप कल्पना में अपने मनपसन्द लोगों को देखते रहें। शिव बाबा, ब्रह्मा बाबा, दीदी-दादी, जानकी दादी को मन में देखते रहें। महात्मा गांधी, महात्मा बुद्ध, महावीर जैन या मदर तेरेसा या कोई और महान आत्मा को देखते रहें। विज्ञानिक बनना चाहते हैं तो पांच श्रेष्ट विज्ञानिको को देखते रहें। बिजनेस में आगे बढना चाहते हैं तो पांच अग्रणी व्यापारियो को मन में आदर्श के रूप में देखो। पांच होशियार विद्यार्थियों की संगति में रहो। पांच महान योगियों की संगति में रहो । जिस भी क्षेत्र में आगे बढ़ना चाहते हैं, वर्तमान में उस क्षेत्र में विख्यात

पांच लोगों से महीने में एक बार मिलने की कोशिश करे। अगर वह नहीं मिल सकते हैं तो उनकी पुस्तकें पढ़ो। मन पसंद पांच लोगों को हर रोज तरंगे दो। मन पसंद लोगों के फोटो अपने घर में रखो। आते जाते उन्हें प्रणाम करते रहो। ऐसा करने से आप देखते ही देखते उन जैसे महान बन जाएंगे। यहां सब करते हुए उनके और अपने बीच शिव बाबा के बिंदू रूप को जरूर देखते रहें। बिंदू को देखने से हमारी मानसिक शक्ति बढ़ जाती है।

मानसिक विकास और आलोचना

विकास हमेशा कार्य करने से होता है और कार्य करने से आलोचना होती है। आप को वह करना चाहिए जिसे दूसरे मानते है कि आप नहीं कर सकते है। आप जो भी दिशा तय करें, हमेशा कोई ना कोई रहेगा जो आप से कहेगा कि आप गलत है। मुश्किलें आप को ललचायेगी कि आप के आलोचक ठीक हैं। आप स्वंय का विकास करें जिस में दूसरे विकास कर सकें। अपने विकास की आप अपनी खुद की योजना बनाओ। अगर आप अपनी योजना नहीं बनाते तो आप किसी

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

## नवजात बालकाची परिचर्या

म्हणून स्तन रिकामे होईपर्यंत पाजावे व नंतर दुसरा स्तन द्यावा. बहुतेक वेळा पोट भरले की, बाळ आपोआपच प्यायचे थांबते. मातेला अनुभवाने यातील क्रिया कळतात. स्तनपान करत असताना कधी-कधी भरपूर जोरात दुग्धस्राव सुरू होतो. अशा वेळेला बाळाला दूध ओढताना ठसका लागण्याची शक्यता असते त्या वेळेस मातेने स्तनाग्राच्यावर व खाली हाताचे पहिले व मधले बोट ठेवून हलकासा दाब द्यावा; त्यामुळे दूध एकदम सुटत नाही. काही स्त्रिया झोपून स्तनपान करतात. अशा वेळेला बाळाच्या नाक व तोंडावर दाब पडल्याने बाळ गुदमरण्याची शक्यता असते; म्हणून शक्यतो झोपून स्तनपान करू नये. स्तनपान करून झाल्यावर स्तनाग्रे कोमट पाण्याने साफ करावीत. स्तनाग्रांना चिरा पडल्या असल्यास त्या ठिकाणी शतधौतघृत किंवा खोबरेल तेल लावावे. स्तनपान झाल्यानंतर बाळाला खांद्यावर धरून ढेकर काढावा, म्हणजे बाळ उलटी करणार नाही. साधारणत: बाळाला १ वर्ष तरी स्तनपान करावे. प्रथम चार महिने पूर्ण स्तनपान व नंतर पूरक आहाराबरोबर स्तनपान करावे. काही स्त्रिया स्तनपान केल्याने त्यांचे शरीर बेढब होते व स्तनांचे सौंदर्य कमी होते' असे समजतात; परंतु हा चुकीचा समज आहे. उलट स्तनपान केल्याने स्तनांचे आरोग्य चांगले राहून स्तन सुडौल होतात व आरोग्यही चांगले राहते.

**स्तन्यदोष :**

बाळाच्या शारीरिक व बौद्धिक अशा सर्वांगीण विकासासाठी आईचे दूध फार महत्त्वाचे असते. पहिले ६ महिने बाळ संपूर्णपणे आईच्या दुधावर अवलंबून असते. आईचा आहार-विहार चुकीचा झाल्यास त्याचा परिणाम स्तन्यउत्पत्तीवर होत असतो.

शारीरिक अशक्तपणा, हीनपोषण असलेला म्हणजेच शरीराचे कमी पोषण करणारा आहार, अतिशारीरिक श्रम, मानसिक अस्थिरपणा, चिंता, क्रोध, वात्सल्याचा अभाव, अतिशोक अशा कारणांमुळे स्तन्य कमी प्रमाणात उत्पन्न होऊन स्तन्यदुष्टी होते. चुकीचा आहार घेतल्याने व मानसिक ताणाने रसधातूवर व त्यामुळे रसधातूचा उपधातू असलेल्या स्तन्यावर परिणाम होतो. आजच्या धावपळीच्या काळात स्त्री कौटुंबिक जबाबदारी सांभाळून नोकरीनिमित्त घराबाहेर पडते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ३० जानेवारी ते १ फेब्रुवारीपर्यंत मेहेरबाबांचा अमरतिथी सोहळा

## देशातून व परदेशातून लाखो मेहेरप्रेमी दर्शनाला व सोहळ्याला येणार


नगर – येथील अरणगाव रोडवरील मेहेराबाद येथे अवतार मेहेरबाबा यांच्या समाधीस्थळी ५६ वी अमरतिथी (पुण्यतिथी) सोहळा ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी पर्यंत होणार असून यासाठी देशातून सुमारे लाखाच्यावर व परदेशातून सुमारे ७०० बाबाप्रेमी, भाविक येतील अशी माहिती विश्वस्त मेहेरनाथ कलचूरी यांनी दिली.





नगरजवळील अरणगाव रोडवरील मेहराबाद येथे अवतार मेहेरबाबा यांचा अमतिथी सोहळा ३० जानेवारी ते १ फेब्रुवारीपर्यंत होणार आहे. छायाचित्रात समाधी व मेहरबाबा प्रतिमा दिसत आहेत.

मेहेरबाबांचे असंख्य भक्त जगात असून असंख्य केंद्रेही आहेत. सर्व जाती धर्मातील लोकांना मानवतेचा व सत्याचा संदेश देत त्यांनी जगभर प्रवास केला. जगात मी कोठेही देह सोडला तरी मेहेरावाद येथे बांधलेल्या समाधीत मला समाधीस्त करावे असे त्यांनी सांगून ठेवले होते. ३१ जानेवारी १९६९ रोजी त्यांचे महानिर्वाण झाले. म्हणून या ठिकाणी अमरतिथी सोहळयासाठी लाखो भाविक येत असतात.



याबाबत अधिक माहिती देताना चेअरमन फॉमरोज मिस्त्री म्हणाले ३० जानेवारी रोजी सकाळी १० वा बाबांची प्रार्थना, आरतीने कार्यक्रमास प्रारंभ होईल. नंतर रात्री १२ वाजेपर्यंत फिल्म शो, तसेच विविध केंद्रावरुन आलेले लोक भजने म्हणतील, ३१ जानेवारी रोजी सकाळी ७ वा आरती प्रार्थना होईल व कार्यक्रम सुरु होईल सकाळी ११ वाजता चेअरमन फॉमरोज मिस्त्री यांचे व्याख्यान होईल, ११.३० वाजता मेहेर धून म्हटली जाईल. बाबानी देहत्याग केला त्यावेळी दुपारी १२ वाजता १५ मिनिटे मौन पाळले जाईल व नंतर सर्व भाषांमधून आरती प्रार्थना होईल. नंतर लगेच कार्यक्रम सुरु होईल तो रात्री १ वाज पर्यंत लोक भजने बाबावरील सांस्कृतीक व नृत्याचा कार्यक्रम, नाटक, गजल, इ. कार्यक्रम सादर करतील.

१ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वा. कार्यक्रम सुरु होईल व दु.१ वाजता आरती, प्रार्थना होऊन कार्यक्रमाची सांगता होईल. दर्शनासाठी भाविकांना नंबर दिले जात असल्याने त्याप्रमाणे रांग लागते. त्यामुळे गडबड गोंधळ होण्याचा प्रसंग येत नाही. संपूर्ण शांततेत शिस्तबध्द पध्दतीने हा उत्सव होतो. ट्रस्टच्या वतीने सध्या कार्यक्रमासाठी मंडपाची उभारणी चालू असून येणाऱ्या भाविकांसाठी स्त्री व पुरुषांसाठी मोठे तंबू उभारण्याचे काम चालू असून त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी, संडास बाथरुमची सोय, आरोग्य सेवा या सेवा उपलब्ध राहणार असून येथे सुमारे ४० हजार भाविक राहतील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तर रेल्वेस्टेशन व बसस्थानक येथून भाविकांच्या सोयीसाठी समाधी स्थळापर्यंत बसेसची सोय आहे. हजारो युवक स्वयंसेवकांचे काम करीत आहे.



गणित विज्ञान प्रदर्शनात मिरी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल विद्यालयाने बाजी मारली.

# श्री छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची गणित विज्ञान प्रदर्शनात बाजी

नगर – तालुकास्तरीय ५२ वे गणित विज्ञान प्रदर्शन २०२४–२५ आयोजित करण्यात आले होते. यात गणित विज्ञान प्रदर्शनात मिरी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल विद्यालयाने बाजी मारली. माध्यमिक शिक्षक गटात सौ. शिरसाठ ए. एस. यांनी प्रथम क्रमांक पटकावला व विद्यार्थी गटामध्ये पुंड प्रतीक बंडू इयत्ता ९ वी प्रथम, गणित गटात घायाळ श्रेया श्रीकांत इयत्ता ९ वी द्वितीय क्रमांक ब्राह्मणे कृष्णा सोपान इयत्ता ५ वी तृतीय क्रमांक पटकावले. विद्यार्थ्यांना सौ. शिरसाठ ए. एस. व सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या शिक्षक व विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य ढोले जी. व्ही. पर्यवेक्षक कटके यु. जी. तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सर्व कमिटी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

या सर्व विद्यार्थ्यांनी धर्मवीर आनंद दिघे हायस्कूल विरगाव अकोला येथे झालेल्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवला.



सोलापूर व पुणे जिल्ह्याच्या पुणे विभागीय कार्याध्यक्षपदी अगस्ती महाविद्यालय अकोले येथील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक महेश पाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली.

# महेश पाडेकर यांची पुणे विभागीय कार्याध्यक्षपदी निवड

## शिक्षक भारती शासन मान्य संघटनेचे राज्याध्यक्ष अशोक बेलसरे यांनी दिले निवडीचे पत्र

नगर – सोलापूर व पुणे जिल्ह्याच्या पुणे विभागीय कार्याध्यक्षपदी अगस्ती महाविद्यालय अकोले येथील कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक महेश पाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून शिक्षणाच्या हक्कासाठी व शिक्षकांच्या सन्मानासाठी शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवण्याचे काम व संघटना बांधणीचे काम अतिशय तळमळीने पाडेकर यांनी केल्याने त्यांना शिक्षक भारती संघटनेचे संस्थापक आमदार कपिल पाटील, राज्याध्यक्ष अशोक बेलसरे, कार्याध्यक्ष सुभाष मोरे, कार्यवाहक संजय वेतुरेकर, विनाअनुदान विरोधी समितीचे राज्याध्यक्ष जयवंत भाबड, विनाअनुदान विरोधी समितीचे महिला राज्याध्यक्ष रूपालीताई कुरुमकर व राज्य कार्यकारिणीच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

अहमदनगर जिल्ह्यात त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेत पगार होण्यासाठी व दरमहा १ तारखेला पगार होण्यासाठी प्रयत्न केले, तसेच आदिवासी दुर्गम भागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी मिळण्यासाठीसुद्धा काम पाडेकर यांनी केले. विभाग स्तरावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक भारती संघटना बांधणीसाठी, शिक्षक भारतीचा प्रचार करण्यासाठी, शिक्षण, समता, प्रतिष्ठा, संधी, सत्ता प्रत्येकाच्या वाट्याला यावी यासाठी लोकशाही, धर्मनिरपेक्ष, समतावादी, आणि विज्ञानभिमुख समाजरचनेसाठी कटिबद्ध आहात असे नियुक्ती पत्रात म्हटले आहे.

### डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशन संचलित

# मुला-मुलींचे निरीक्षणगृह व बालगृह वार्षिक स्नेहसंमेलन व क्रिडा महोत्सव तसेच माजी-आजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

नगर – डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशन संचलित, मुला मुलींचे निरीक्षणगृह व बालगृह वार्षिक स्नेह संमेलन व क्रिडा महोत्सव तसेच माजी आजी विद्यार्थी मेळावा उत्साहात साजरे झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, कमिन्स इंडियाचे एक्झिक्युटीव्ह मॅनेजर विकास साळवे, तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी एन बी कराळे यांच्या उपस्थितीत झाले



डिस्ट्रिक्ट प्रोबेशन ॲण्ड आफ्टर केअर असोसिएशन संचलित मुला मुलींचे निरीक्षणगृह व बालगृह वार्षिक स्नेह संमेलन व क्रिडा महोत्सव तसेच माजी आजी विद्यार्थी मेळावा उत्साहात झाला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व अध्यक्षांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन व आकाशात फुगे सोडून सुरुवात झालो. सौ. सुलोचना काळापहाड यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला, संस्थेच्या अधिक्षिका सौ. पौणिमा माने यांनी संस्था राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती विषद दिली.

संस्थेच्या कार्याची व संस्थेविषयी माहिती संस्थेच्या मानद सचिव डॉ. शकिल फातेमा शेख यांनी दिली. भावो पिढीने जास्तीत जास्त वाचन करुन शिक्षण घेवून सर्वांगीण विकास करुन शिक्षणाशिवाय या जगात काही पर्याय नाही व आधुनिक जगात वावरत असताना मुलांनी काळाची गरज वेगळे शैक्षणिक उपक्रमाविषयी माहिती घेवून तसे शैक्षणिक पात्रता धारण कराची, तसेच त्यांनी मुलांना वाचाल तर वाचाल हा मंत्र दिला तसेच ते अध्यक्ष असलेल्या अ.नगर जिल्हा वाचानालय येथे मुले मुलींकरीता मोफत सभासद दिली जाईल असे सांगितले.

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी एन बी कराळे व बाल संरक्षण अधिकारी वैभव देशमुख यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.ए. डी. चौधरी, ॲड. गोविंद मिरीकर, मानद सचिव ॲड. विश्वासराव आठरे, खजिनदार ॲड. जयवंत भापकर, सचिव, डॉ. अमित बडवे, लोकमान्य टिळक प्रा.शाळा मुख्याध्यापक शशिकांत वाघुलकर व संस्थेचे विश्वस्त यांचे सत्कार करणेत आले. क्रिडा स्पर्धा घेण्यात आले त्यांचे नियोजन नदीम शेख व सचिन जाधव यांनी उत्तमरित्या केले. उदय म्हस्के यांनी आभार मानले. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. सुत्रसंचलन सौ. सुलोचना काळापहाड व व्यवस्थापन सौ. पौर्णिमा माने यांनी केले. संस्थेतील मुल मुलींनी विविध कला गुणदर्शन कार्यक्रम सादर केले.

# व्यक्तीने सर्व समाज घटकांचा विचार करून मूल्य जपावी

## डॉ. प्रशांत पठारे यांचे प्रतिपादन

नगर – सण-उत्सव साजरे करताना व्यक्तीने सर्व समाज घटकांचा विचार करून मुल्य जपावे. विद्यार्थ्यांना मूल्यधिष्टीत शिक्षण द्यावे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मॅककेअर मल्टीस्पेशालीस्ट हॉस्पिटलचे डॉ. प्रशांत पठारे यांनी केले.



एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक शाळा येथे प्रजासत्ताकदिन कार्यक्रमात डॉ. प्रशांत पठारे, सुधीर खिलारी, अनिल साळुंके, एन.ए.पठाण, देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, समीर पठाण आदी.

## डॉ. पी.ए. इनामदार महाविद्यालय येथे प्रजासत्ताक दिन साजरा

एकता एज्युकेशन ॲण्ड वेलफेअर सोसायटी संचलित डॉ. पी.ए. इनामदार प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूल, महाराष्ट्र कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय गुरुकुल कॅम्पस, तपोवनरोड येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. ध्वजारोहण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आर्थोपिडेक सर्जन डॉ. प्रशांत पठारे व उद्यजोक सिव्हिल इंजिनिअर सुधीर खिलारी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चेअरमन अनिल साळुंके तसेच संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण, देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, समीर पठाण, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड, गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलच्या प्राचार्या दिप्ती कराळे व महाराष्ट्र कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य शुभम टेमकर आदी उपस्थित होते.

संस्थेचे चेअरमन अनिल साळुंके यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत प्रजासत्ताक दिनाची माहिती सांगितली तसेच संस्थेचे अध्यक्ष एन.ए.पठाण यांनी आपल्या भाषणात विद्यालयाच्या प्रगतीची माहिती दिली.

सदर कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी द्वेशभक्तीपर भाषणे व गायन प्रजासत्ताक दिनाचा संदेश प्रभावीपणे मांडला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्या दिप्ती कराळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन शितल रहाणे व इ. ९ वी तील विद्यार्थिनी इकरा शेख यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिल्पा शिंदे, प्रियंका बोरुडे, शितल कडूस, सबा शेख, अमोल निमसे, अभिजीत गवारे, सबिहा शेख, मनीषा शिंगाडे, ममता कोरी, राधा चौधरी, अक्षय बोरुडे, योगिता मोहिते, गायत्री शेळके, फातिमा शेख, संजीवनी वणवे, वैशाली कर्डिले, वैशाली तागड, मुबीना बागवान, दुर्रेशहवार बागवान, अश्विनी चौधरी, अनिता कुमावत, इरशान शेख, जैनब शेख, शहला पटेल, परवेज शेख, सलमान पठाण, आसिफ पठाण, ज्योती मुर्तडकर, विमल पोतखुले आदींनी परिश्रम घेतले.

# किशोर संस्कृत संवर्धिनी प्रशालेत शेष पारितोषिक समारंभ उत्साहात साजरा

नगर – अहमदनगर एज्युकेशनस सोसायटीची किशोर संस्कृत संवर्धिनी प्रशालेत शेष पारितोषिक वितरण समारंभ झाला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर महानगरपालिका शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण होते.




अहमदनगर एज्युकेशनस सोसायटीची किशोर संस्कृत संवर्धिनी प्रशालेत शेष पारितोषिक वितरण समारंभ झाला.

इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी मानवी हत्तीच्या रूपाने स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला कळमकर यांनी केले. त्यांनी प्रास्ताविकामध्ये संस्थेअंतर्गत होणाऱ्या विविध स्पर्धा, बहिस्थ स्पर्धा व क्रीडा स्पर्धा यामध्ये बक्षीस मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या एकूण पट ६२५ पैकी ३७६ विद्यार्थ्यांना बक्षीस मिळाल्याचे सांगितले.

प्रशासनाधिकारी जुबेर पठाण यांनी जीवनातील शालेय शिस्त व खेळांचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. जुबेर पठाण यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. त्यांनी बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक अविनाश लबडे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. अनिता तिवारी यांनी केले. शिक्षक प्रतिनिधी मुकुंद पालवे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रीकांत खर्डे, श्रीमती संगीता घिगे, सौ. कविता रच्चा तसेच प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कर्जत तालुक्यात प्रथमच ३० जानेवारी ते ३ फेब्रुवारी दरम्यान राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

नगर – सर्वसामान्य शेतकरी बंधू आणि भगिनी यांच्यासाठी कर्जत तालुक्यातील सदगुरू ग्राम विकास प्रतिष्ठान व कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत यांच्यावतीने राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन ३० जानेवारी ते ३ फेब्रुवारी दरम्यान कर्जत शहरात फाळके पेट्रोल पंपा शेजारील मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. हे कृषी प्रदर्शन सर्वांसाठी मोफत आहे.

तालुक्यातील सर्वसामान्य शेतकरी बंधू व भगिनींसह नव उद्योजक, व्यावसायिक, नोकरदार व खवय्ये यांना या प्रदर्शनाचा लाभ मिळणार आहे. या कृषी प्रदर्शना मध्ये नवनवीन तंत्रज्ञान, अवजारे, ट्रॅक्टर्स, ठिबक सिंचन, सोलर, खते बी बियाणे, पशुसंवर्धन व पशुआहार सह शेती विषयक सर्व काही एकाच ठिकाणी पाहता येणार असून महिलांसाठी घरगुती उद्योगाची माहितीही उपलब्ध होणार आहे.

या कृषी प्रदर्शनाचे खास आकर्षण एक कोटी किमतीची भारतातील प्रसिद्ध अनेक पुरस्कार प्राप्त कर्नाटक येथील रेडा जोडी असणार आहे.

तसेच महिलांसाठी गृहोपयोगी वस्तुंचे अनेक स्टॉल्स या ठिकाणी असणार आहे. तसेच खवय्या साठी कोल्हापुरी पांढरा-तांबडा रस्सा व निरनिराळ्या खुप साऱ्या पदार्थांची चव घ्यायला मिळणार आहे.

या कृषी प्रदर्शनाचे आयोजन सदगुरू ग्राम विकास प्रतिष्ठान कर्जत व कृषी उत्पन्न बाजार समिती कर्जत यांनी केले आहे. लाभ घेण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र फाळके पा. व कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर व संचालकांनी केले आहे

# नवनाथ भक्त सेवा मंडळाच्यावतीने मायंबा येथे २९ जानेवारी रोजी विशाल भंडाराचे आयोजन

नगर – नवनाथ सांप्रदायातील आद्य सर्वात मोठे नाथ बडेबाबा मच्छिंद्रनाथांची संजीवनी समाधी नगरपासुन ४५ कि.मी.अंतरावर बीड जिल्ह्यातील सावरगांव येथुन २ कि.मी.अंतरावर गर्भगिरी डोंगरावर मायंबा (मच्छिन्द्रनाथ गड) येथे असुन येथे मच्छिंद्रनाथानी संजीवनी समाधी सुमारे ७०० वर्षापुर्वी पौष अमावास्येला घेतली असुन त्यानिमित्त नगरच्या चैतन्य नवनाथ भक्त सेवा मंडळाच्या वतीने २९ जानेवारीला विशाल भंडाराचे आयोजन करण्यात आले आहे



भंडारा २५ वर्षापासुन करण्यात येत असून सुरवातीला १०० कि.पासुन चालु झालेला हा भंडारा ७००कि.भरडा, ७०० कि.गुळ, ७०० कि. तांदुळ, ११ डबे गायीचे गावरान तुप व सांबार करीता लागणारे डाळी, तेल, मसाले, इतर साहित्य भाजीपाला असे २५०० कि.पर्यंत पोहोचला आहे. यामध्ये सांबर-भात, लापशी महाप्रसाद बनवुन संपुर्ण दिवस पंगती मध्ये प्रसाद दिला जातो. त्यासाठी १०० बाय ८० फुट मंडप उभारण्यात येत असुन असून बडेबाबांच्या समाधीची विविध प्रकारची फळे आणि रंगीबेरंगी फुलाने भव्य सजावट मंडळाच्या वतीने नाथसेवक करत असतात.

त्याचबरोबर श्री मच्छिंद्रनाथ महाराज देवस्थान ट्रस्ट संचलित गोशाळेला चाराही मंडळाच्या वतीने अर्पण करण्यात येतो.बडेबाबांच्या समाधी दिनानिमित्त तीन दिवस सावरगांवची यात्रा असते यात नैवेद्य मिरवणूक, छबिना मिरवणुक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, नामवंत मल्लाचे कुस्तीचे फड असतो. भंडारा, महाप्रसादास देणगी व वस्तु देण्यासाठी इच्छुक असणाऱ्या भाविकांनी गणेश पलंगे सबजेल चौक, ९१३०००८७५५, महेश निकम, प्रेम कलेक्शन, तेलीखुंट, ९०११११८५३, ऋषीकेश नागले, मेघा किडस्, तेलीखुंट, ९०२८२०२६४१ संपर्क साधावा.

# महिलांनी अध्यात्मिकरित्या सक्षम बनण्याची गरज

## ब्रदर अमिस लोपेज यांचे प्रतिपादन; अहमदनगर पहिली मंडळी-कॉंग्रिगेशनल या चर्चच्या महिला मंडळाचे एक दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात

नगर – महिलांनी अध्यात्मिक रित्या सक्षम बनण्याची गरज आहे. आजच्या युगात परमेश्वराचे विचार महिलांना समजायला हवे, कारण जीवनात परमेश्वराने महिलांना खुप मोठी जबाबदारी सोपविली आहे. परमेश्वरांचे विचार आपल्याला समजले की जीवनत सुखी आणि आनंदाने जगता येते. महिलांवर घरची जबाबदारी असते, समाजाची जबाबदारी असते, ज्या ठिकाणी ती कामाला असते व्यवसाय करत असते त्याठिकाणचीही खुप मोठी जबाबदारी असते. यासर्व जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्यासाठी तीला परमेश्वरानी दाखविलेल्या मार्गाची गरज असते, असे प्रतिपादन ब्रदर अमिस लोपेज (वसई) यांनी केले.



अहमदनगर पहिली मंडळी-कॉंग्रिगेशनल या चर्चच्या महिला मंडळाचे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित केले होते.

अहमदनगर पहिली मंडळी -कॉंग्रिगेशनल या चर्चच्या महिला मंडळाचे एक दिवसीय राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित केले होते. या अधिवेशनात ब्रदर अमिस लोपेज (वसई) यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षा सुवर्णा मिसाळ, सेक्रेटरी संगिता सोनावणे, खजिनदार प्राची थोरात, अहमदनगर पहिली मंडळी-कॉंग्रिगेशनलचे रविंद्र ठोंबरे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रास्तविकात अध्यक्षा सुवर्णा मिसाळ म्हणाल्या की, महिलांना अध्यात्मिक रित्या सक्षम करण्यासाठी अहमदनगर पहिली मंडळी -कॉंग्रिगेशनल या चर्चच्या महिला मंडळाच्या वतीने राज्यस्तरीय महिला अधिवेशन भरविण्यात आले. आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेक महिलांना सुखी जीवन जगता येत नाही. त्या वेगळ्या मार्गाकडे जाऊन सुखी जीवनात अनेक अडथळे निर्माण करुन घेतात. त्यासाठी महिलांना अध्यात्मिकांची आणि परमेश्वांच्या विचारांची माहिती व्हावी, या उद्देशाने हे अधिवेशन भरविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या अधिवेशनाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ३५० प्रतिनिधी हजर होते. अधिवेशन यशस्वीतेसाठी चर्च च्या सर्व महिला प्रतिनिधींनी प्रयत्न केले.

# भाजी मंडईसह ३ मजली व्यापारी संकुल बांधण्याच्या आराखड्यात आमची जागा दाखवा? ओटेधारक विक्रेते व गाळेधारकांची ओरड

**खासदार निलेश लंके यांनी केली नेहरु मार्केटच्या जागेची पञ्हणी, गुरुवारी आयुक्तांसह बैठक**

नगर – शहरातील नेहरु मार्केटच्या जागेची खासदार निलेश लंके यांनी पहाणी केली. तर पूर्वीच्या नेहरु मार्केटमधील ओटे धारक भाजी विक्रेते व गाळेधारक यांच्याशी चर्चा करुन त्यांचे प्रश्न जाणून घेतले. यावेळी नेहरु मार्केटच्या ओटे धारक भाजी विक्रेते व गाळेधारकांनी महापालिकेने तयार केलेल्या भाजी मंडईसह तीन मजली व्यापारी संकुल बांधण्याच्या आराखड्यात योग्य जागा मिळण्याची मागणी केली. या संदर्भात खासदार लंके यांनी गुरुवारी (दि.३० जानेवारी) आयुक्तांसह नेहरु मार्केटच्या ओटे धारक भाजी विक्रेते व गाळेधारक यांच्यासह बैठक घेवून त्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी हातगाडी भाजी विक्रेते संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संजय झिंजे, युवा सेनेचे विक्रम राठोड, प्रदीप (भैय्या) परदेशी, योगीराज गाडे आदी उपस्थित होते.



नेहरु मार्केटच्या जागेची पाहणी करताना खासदार निलेश लंके. समवेत संजय झिंजे, विक्रम राठोड, प्रदीप (भैय्या) परदेशी, योगीराज गाडे आदी.

महापालिकेच्या वतीने सन २०११ मध्ये नेहरु मार्केट पाडण्यात आले. सन २०१७ च्या सुमारास बीओटी तत्त्वावर व्यापारी संकुल व भाजी मंडई उभारण्याचा निर्णय बारगळला. अनेकवेळा मार्केट उभारणीचा निर्णय होवून तो पूर्णत्वास गेलेला नाही. नेहरु मार्केटमधील सर्व ओटे, गाळेधारक हॉकर्स युनियन, हातगाडी भाजी विक्रेते संघटनेच्या माध्यमातून विविध आंदोलन, उपोषण व महापालिका प्रशासनाशी पाठपुरावा करुन अद्यापि नेहरु मार्केट बांधण्यात आलेले नाही. यामुळे येथील भाजी विक्रेते ओटे धारक रस्त्याच्या कडेला बसून आपला उदरनिर्वाह करीत आहे. महापालिकेने तयार केलेल्या भाजी मंडईसह तीन मजली व्यापारी संकुल बांधण्याच्या निर्णयाचे सर्व सर्व ओटे, गाळेधारक हॉकर्स युनियन, हातगाडी भाजी विक्रेते संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले आलेले आहे. मात्र मनपा प्रशासनाने या आराखड्यात त्यांची जागा दाखवून देण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार लंके यांच्याकडे सर्व ओटे, गाळेधारक हॉकर्स युनियन, हातगाडी भाजी विक्रेते संघटनेच्या वतीने प्रश्न मांडला असता, त्यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पहाणी करुन सर्व ओटे भाजी विक्रेते व गाळेधारक यांच्याशी संवाद साधला.

नेहरु मार्केट १३ वर्षांपूर्वी पाडण्यात आले. ते बांधण्यासाठी पुन्हा महापालिकेने हा प्रकल्प बीओटी तत्वावर न देता स्वत: विकसीत करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र हा आराखडा तयार करताना येथील पूर्वीचे सर्व ओटे व गाळेधारक यांची जागा दाखविण्यात आलेली नाही. याबाबत संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे. ७२ ओटे धारक व १७ गाळेधारकांचा हा प्रश्न आहे. गुरुवारी आयुक्तांसह होणाऱ्या बैठकीत आराखड्यात सर्व ओटे व गाळेधारक यांची प्रत्यक्ष जागा कुठे असणार आहे? याची माहिती घेतली जाणार आहे. अनेक वर्षापासून जागेपासून वंचित केलेल्या या घटकांना योग्य स्थान न मिळाल्यास त्या आराखड्याला तीव्र विरोध केला जाणार आहे. तर वेळप्रसंगी उच्च न्यायालयात जाण्याचा इशारा संजय झिंजे यांनी दिला आहे.

# महा-रेराद्वारे घेतलेल्या परीक्षेत जामखेडचे तेजस कोठारी उत्तीर्ण



जामखेड – महाराष्ट्र राज्य रियल इस्टेट रेग्युलेटरी अॅक्ट (महा – रेरा) द्वारे घेतलेल्या परीक्षेत जामखेडचे तेजस संजय कोठारी हे उत्तीर्ण झाले आहे. महाराष्ट्र मध्ये रिअल इस्टेट सल्लागार म्हणून काल करण्यासाठी शासन ही परीक्षा घेत असते. २०१८ पासून आत्तापर्यंत ६ वेळा ही परीक्षा झाली. ४ जानेवारी रोजी परीक्षा राज्यात पर पडली होती. ज्याचा निकाल जाहीर करण्यात आला.

रियल इस्टेट क्षेत्रात ग्राहकांची फसवणूक होऊ नये, कामे दिलेल्या वेळेत पूर्ण व्हावी ह्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महा रे रा ह्या संस्थेची स्थापना देशात २०१८ पासून झालेली आहे. रेरा द्वारे नोंदणी कृत प्रकल्पांत व्यवहार करण्याचा अधिकार फक्त रेरा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सल्लागारांनाच असतो हा नियम आहे. म्हणून ही परीक्षा प्रॉपर्टी एजंट साठी अत्यंत महत्वाची मानली जाते.

महा रेरा ची परीक्षा पास झालेले जामखेड मधील तेजस कोठारी हे एकमेव आहे.

# अंबिकानगरला १ फेब्रुवारीला श्री गणेश यागचे आयोजन

नगर – महाराष्ट्रातील पहिली गृह बांधणी संस्था असलेल्या अंबिकानगर येथील अंबिका गृह बांधणी संस्था आणि यांच्याशी संलग्न असलेल्या श्री गणेश व दत्त देवस्थान ट्रस्ट यांनी गणेश जयंतीचे औचित्य साधून १ फेब्रुवारी रोजी 'गणेश याग' चे आयोजन अंबिकानगर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालय या ठिकाणी केले आहे. याचे पौराहीत्य वेदगुणसंपन्न पंढरपूरकर गुरुजी हे करणार आहेत. या मध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन संचालक मंडळानी केले आहे.

यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष प्रमोद शेजुळ यांनी केले आहे. सहभागी होण्यासाठी ज्ञानेश देशपांडे ९२२६३६१३५७, आशिष आचारी ८६००००२१२५, संजय बोरगे ९२७२४८३४९१, नंदकुमार पोळ ७८७५५०००५६ यांच्याशी संपर्क साधावा.

# प्रितीज पाठशाळाच्या वतीने स्पेल-इट-वेल २०२५ शब्दलेखन स्पर्धेचे १६ फेब्रुवारीला आयोजन

नगर – प्रितीज पाठशाळाने स्पेल-इट-वेल २०२५ या ऑफलाइन शब्दलेखन स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. विद्यार्थ्यांचे शब्दलेखन कौशल्य वाढवणे आणि आत्मविश्वास विकसित करणे हे या स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट आहे. विशेष म्हणजे ही प्रितीज पाठशाळाची तिसरी वार्षिक शब्दलेखन स्पर्धा आहे. एलकेजी, युकेजी, इयत्ता पहिली, दुसरी, तिसरी, चौथी आणि पाचवी अशा गटात स्पर्धा होणार आहे. प्रत्येक गटातील विजेत्यांना ट्रॉफी दिल्या जातील. तसेच फन की लॅण्ड गिफ्ट पार्टनरकडून फ्री कूपन्सही दिली जातील. ही स्पर्धा सर्व शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.

नाव नोंदणीची अंतिम मुदत ३१ जानेवारी पर्यंत असून नोंदणी शुल्क २४९ रूपये आहे. स्पर्धेसाठी लागणारी शब्दांची यादी सर्व नोंदणीकृत विद्यार्थ्यांना आधीच पुरवली जाईल, ज्यामुळे त्यांना चांगली तयारी करता येईल. नोंदणीसाठी संपर्क साधा: मो. ९५२७४०४७२७ आणि ८७९३४४५५९८., जीपेसाठी फोन नंबर: ९५२७४०४७२७. अधिक माहितीसाठी भेट द्या: www.preethispathshala.com. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले आहे.

# केडगावात रंगली फिटनेस स्पर्धा, युवकांचा प्रतिसाद; डेड लिफ्ट, स्कॉट, पुलप्स, बेंच प्रेसमधून शक्तीप्रदर्शन

नगर – निरोगी आरोग्य व व्यसनमुक्तीचा संदेश देत युवकांसाठी केडगावात फिटनेस स्पर्धा रंगली होती. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून एसपी फिटनेस व एसपी न्यूट्रिशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेत युवकांचा प्रतिसाद लाभला. युवकांनी डेड लिफ्ट, स्कॉट, पुलप्स, बेंच प्रेस प्रकारात शक्तीचे प्रदर्शन घडविले.



एसपी फिटनेस व एसपी न्यूट्रिशन यांच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून घेतल्या गेलेल्या फिटनेस स्पर्धेमध्ये विजयी झालेले खेळाडू.

या स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून एकनाथ वाघमारे, अजय गायकवाड, श्रावण पारधे, डॉ. श्रीधर गादेवार, वानखेडे सर उपस्थित होते. या मधील विजयी स्पर्धकांना चषक, प्रमाणपत्र प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

अजय गायकवाड यांनी आजची युवा पिढी व्यसनाच्या आहारी जात असताना युवकांना आरोग्याचा कानमंत्र देण्यासाठी घेण्यात आलेली स्पर्धा प्रेरणादायी आहे. व्यायामाद्वारे सदृढ व निरोगी समाज होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या स्पर्धेत डेड लिफ्ट प्रथम– आदित्य चाकणे, द्वितीय– शुभम करपे, तृतीय– अभिषेक थोरात, स्कॉट प्रथम– ईशान आजबे, द्वितीय– ओंकार पोटे, तृतीय– जयदेव नन्नवरे, पुलप्स प्रथम– प्रमोद डोंगरे, द्वितीय– सोहम कोतकर, तृतीय– आशिष भोर, बेंच प्रेस प्रथम– किशोर शिंदे, द्वितीय– शुभम कर्पे, तृतीय– यश बोरुडे यांनी बक्षिसे पटकाविली.

सर्व खेळाडूंना फिटनेस कोच सचिन पारधे, सिद्धार्थ पारधे, राहुल पारधे, अभिजीत पारधे यांचे मार्गदर्शन लाभले.

संचालक श्रावण पारधे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले.

# धर्मनाथ बीज सोहळ्यानिमित्त नालेगांव येथे ३ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



नगर – नालेगांव येथील माया मच्छिंद्रनाथ देवस्थान नाथयोगी परिवाराच्यावतीने धर्मनाथ बीज निमित्त २९ ते ३१ जानेवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यामध्ये २९ जानेवारी रोजी ध्वजारोहण, महाअभिषेक, धुनी, नवनाथ सामुहिक पारायण प्रारंभ, शिव–शक्ती स्वहाकार, सामुहिक शिवलिंग पूजन, महाआरती व रात्री आई साहेबांचा जागर. ३० जानेवारी रोजी पहाटे नाथांचा महाअभिषेक, मल्हार याग, दत्त सहस् नाम स्वाहाकार, १०८ कुंडात्मक ओम शिव मछिंद्र नाथाय नमः या मंत्राचा सव्वालक्ष स्वाहाकार ,महाआरती व रात्री जागरण गोंधळ, ३१ जानेवारी रोजी पहाटे नाथांचा महाअभिषेक, गुरुमाळ गुरुमंत्र सोहळा, भिक्षा फेरी, व पालखी सोहळा, सायंकाळी मिरवणुक, महाआरती, महाप्रसाद होईल. तसेच ३१ जानेवारी रोजीच दादागुरु मच्छिंद्रनाथजी महाराज यांच्या मायांबा येथील पादूका दर्शन असे कार्यक्रम होणार आहेत. सायंकाळी ७ नंतर महाप्रसाद व पादुका दर्शन होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन माया मच्छिंद्रनाथ देवस्थान, नाथयोगी परिवार, नालेगांव च्यावतीने करण्यात आले आहे.

# नगरमध्ये ३१ जानेवारीला श्री रामदेवबाबाजी यांचा 'विशाल जम्मा जागरण व भजन संध्या कार्यक्रम'




नगर – माघ सुदी बीजे निमित्ताने अहिल्यानगर येथे श्री रामदेवबाबाजी यांचा विशाल जम्मा जागरण व भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.

३१ जानेवारी रोजी सायंकाळी ५ ते रात्री १२ यावेळेत बुरुडगाव रोडवरील आर्यन लॉन्स येथे जम्मा गायक सुशिल गोपाल बजाज (हैदराबाद) सुमधुर वाणीतून कार्यक्रम सादर करणार आहेत. यावेळी गुरुदेव अशोक मुथा बापजी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती धनेश कोठारी यांनी दिली.

श्री रामदेव बाबाजी यांचा मोठा भक्त वर्ग नगरमध्ये आहे. श्री रामदेव भक्त मंडळ ट्रस्ट तर्फे शहरात वेळोवेळी धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात. आताही ट्रस्टच्या सहकार्याने शहरात जम्मा जागरण कार्यक्रम होणार आहे. भाविकांनी यात सहभागी होण्याचे आवाहन सकल राजस्थानी युवा मंच (ट्रस्ट) एवम् महिला मंचातर्फे करण्यात आले आहे.

# वर्का स्कूलमध्ये विद्यार्थी व पालकांनी अनुभवली ग्रहांची प्लॅनेट परेड

नगर – अरणगांव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज व फिनिक्स स्कूलमध्ये विद्यार्थी व पालकांसाठी ग्रहांची प्लॅनेट परेड पहाण्याची संधी उपलब्ध करण्यात आली होती.



अंतराळातील सर्व ग्रहांची परेड ही अत्यंत दुर्मिळ घटना आहे. ही खगोलीय घटना ३९६ अब्ज वर्षांतून एकदा घडते, असा दावा केला जात आहे. ही परेड टेलिस्कोपद्वारे पहाण्याचा अनुभव विद्यार्थी व पालकांना घेता आला. यावेळी शनि ग्रहा भोवतीची रिंग, लाल ग्रह म्हणून ओळखला जाणारा मंगळ ग्रह, बुध ग्रह, गुरु ग्रह पहाण्याच्या दुर्मिळ संधीचा विद्यार्थी व पालकांनी उस्फूर्तपणे लाभ घेतला.

यावेळी वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा श्रीमती रुहिया, वर्का स्कूलचे मुख्याध्यापक डॉ. रामीन हुसैन, उपमुख्याध्यापिका शबनम खान, फिनिक्स अॅकॅडमीच्या मुख्याध्यापिका मिताली बाजपेयी आणि सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होता.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकतींमध्ये **भिमाबाई दत्तु डोंगरे** यांचा वारस हक्काने मालकीहक्क कब्जे वहिवाट आहे. तसेच सदर मिळकती बाबत रे.मु. नं. २१३/२०२० शहर अहमदनगर येथिल मे. सिव्हील जज्ञ साहेब सि.डी. यांच्या कोर्टात दावा प्रलंबित आहे. खालिल नमुद मिळकती बाबत अद्याप पावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही तसेच भिमाबाई डोंगरे यांची फसवणुक करुन त्यांच्या कडुन विनामोबदला हक्कसोड पत्र करुन घेतलेले असुन सदर मिळकतींबाबत मा. दिवाणी न्यायालयात वाद प्रलंबित आहे असे असतांना केतन संभाजी बांगर व कचरु अंबादास बांगर लोकांची दिशाभुल करुन खालिल नमुद मिळकती विक्री करण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जाहिर नोटीस द्वारे तमाम लोकांस कळवण्यात येते की खालिल परिशिष्टात नमुद मिळतींबाबत मा. न्यायालयात वाद प्रलंबित असुन भिमाबाई दत्तु डोंगरे यांचा सदर मिळकतींमध्ये वारसा हक्काने कायदेशीर हक्क हितसंबंध आहे सबब सदर मिळकतींबाबत कोणीही कोणत्याही स्वरुपाचा व्यवहार करुनये याउपरही कोणीही सदर मिळकतींबाबत कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार भिमाबाई दत्तु डोंगरे व त्यांच्या हिश्याच्या मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी विनाकारण कोणाचीही फसवणुक होऊ नये याकरिता सदरची जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन -**

१) जिल्हा अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नागापुर येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे आर. | आकार |
|---|---|---|---|
| ११/४ | १ | ०हे- १२.५० आर. | १रू - १२ पै. |

**यांसी चतु:सिमा- रेकॉर्डप्रमाणे**

२) जिल्हा अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे नागापुर येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे आर. | आकार |
|---|---|---|---|
| ११/४ | ३ | ०हे- २६.३० आर. | १रू - १२ पै. |

**यांसी चतु:सिमा- रेकॉर्डप्रमाणे**

३) जिल्हा अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हापरिषद हद्दीतील मौजे वडगांवगुप्ता येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रू-पैसे | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ५७० | ०-६५ | १-१९ | गट नं. ५६८ | गट नं. ५६७ | गट नं. ५७२ | गट नं.५६९ |
| ३०६ | ० - २१, ख ०-०१, ए०-२२ | ०-७८ | गट नं.३१३ | गट नं. ३०२ | गट नं. ३०४ | गट नं. ३०७ |
| २९४ | ० - ३९, ख ०-०१, ए०-४० | १-५९ | गट नं. २९३ | ओढा | गट नं.२९७ | गट नं.२९५ |
| १९५ | ०-६३ | २-१२ | गट नं. १९१ पै | गट नं. १९६ | गट नं. २९० | गट नं. १९४ |
| २१९ | ०-०७ | ०-०८ | रस्ता | गावठाण | गट नं. २२१ | गट नं.२२० |

४) जिल्हा अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हापरिषद हद्दीतील मौजे शेंडी येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| गट नं. | क्षेत्रफळ हे आर. | आकार |
|---|---|---|
| ४२८ | ३हे - ५२ आर. | २रू - ६८ पै. |

**यांसी चतु:सिमा- रेकॉर्डप्रमाणे**

तारीख :- २८/०१/२०२५

**नोटीस देणार**
**भिमाबाई दत्तु डोंगरे**
**मो. ७७५८९७४०४१**

# धनगर समाज सेवा संघाचा राज्यस्तरीय वधू-वर मेळावा



नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी धनगर समाज सेवा संघाच्यावतीने ३१ मार्च रोजी गंगा लॉन, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर येथे राज्यस्तरीय वधू–वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष राजेंद्र तागड यांनी दिली.

या मेळाव्यात सर्व शाखीय, शिक्षित, उच्च शिक्षित, व्यवसायिक वधू–वर नोंदणी व व्यवसायाची जाहिरात २५ फेब्रुवारीपर्यंत पाठवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. समाज बांधवांनी सहभागी व्हा, असे अध्यक्ष राजेंद्र तागड, संतोष गावडे, सुर्यकांत तागड, निशांत दातीर आदिंसह पदाधिकारी कार्यरत आहेत. अधिक माहितीसाठी ९४२२७८३१३२ किंवा ९८५०२०३७४५ या क्रमांकवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# श्री मच्छिंद्रनाथ उत्सव भंडारा २९ जानेवारी रोजी साजरा होणार




नगर – शास्त्रीनगर, केडगांव देवी जवळ, शंकर धाम, विजयनाथ केदारबाबा, प्लॉट नं. १६ पारस कॉलनी येथे श्री नवनाथ भक्तीसार ग्रंथ अध्याय २३ वा मधील कवी नारायण अवतार सदगुरु मच्छिंद्रनाथ यांच्या मनोकामनेने प्रेरीत होऊन शिव अवतार सद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या आशिर्वादाने आणि गुरुवर्य श्री विजयनाथ केदारबाबा यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सुरु केलेला ५६वा श्री मच्छिंद्रनाथ उत्सव भंडारा सालाबादप्रमाणे यंदाही पौष अमावस्या २९ जानेवारी रोजी साजरा होणार आहे.

सकाळी ९ ते ११ वा. संत पुजन माधवबाबा व ह.भ.प. छगनमहाराज मालुसुरे व दुपारी १ ते ४ ब्राह्मण कुमारीका आणि सुवासिनी पुजन व पालखी मिरवणूक, महाआरती महाप्रसाद (भंडारा) संध्या. ८ ते ९ भजन संध्या होणार आहेत.

या कार्यक्रमासाठी नाथभक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन शंकरलिला परिवाराचे अध्यक्ष जती विजयनाथजी केदारबाबा, केडगांव अहिल्यानगर यांनी केले आहे.

## परिशिष्ट - १

## महाराष्ट्र शासन कृषी विभाग

## उपविभागीय कृषि अधिकारी अहिल्यानगर यांचे कार्यालय

खुली निविदा जाहिरात क्रं-०१/२०२४-२५ दि. २४/०१/२०२५

पत्ता- उप विभागीय कृषि अधिकारी अहिल्यानगर कार्यालय कृषि चिकित्सालय, भुतकरवाडी, सावेडी, अहिल्यानगर

ई-मेल -: sdaoahemednagar@gmail.com दुरध्वनी / फॅक्स क्रमांक - फोन क्र. ०२४१२४३०८४५

## बी - १ खुली निविदा सुचना क्रं - १ / सन २०२४-२०२५

उपविभागिय कृषी अधिकारी अहिल्यानगर, हे जलयुक्त शिवार अभियान २० विशेष निधी अंतर्गत पारनेर व पाथर्डी तालुक्यातील मृद व जलसंधारण कामांचे खाली नमुद केलेले दरपत्रक अ. नगर जिल्ह्यातील पात्र खुल्या वर्गातील नोंदनीकृत कंत्राटदार यांचेकडुन सिलबंद निविदा दरपत्रक मागवित आहेत. कोरे निविदा फॉर्म उपविभागिय कृषी अधिकारी कार्यालय अहिल्यानगर तालुका बीज गुणन केंद्र, जुने पंपींग स्टेशन रोड, सावेडी, ता. अहिल्यानगर, जिल्हा - अहिल्यानगर यांच्या कार्यालयात सुट्टीखेरीज कार्यालयीन वेळेत स.१०.०० ते १८.०० वाजेपर्यंत दि. २८.०१.२०२५ ते दि. ११.०२.२०२५ या कालावधित मिळतील. सिलबंद निविदा ह्या ११.०२.२०२५ पर्यंत मुदतीत सादर कराव्यात. सादर केलेल्या सिलबंद निविदा ह्या दि. १२.०२.२०२५ रोजी ११.३० वाजता उपविभागिय कृषी अधिकारी कार्यालय अहिल्यानगर ता. अहिल्यानगर येथे उघडण्यात येतील. सदर निविदेविषयी अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा खाली सही करणारे सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. निविदा पुर्व बैठक दिनांक - ०६/०२/२०२५ स. ११.३०, बैठकीचे ठिकाण- उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर.

| अक्र | तालुका | गावाचे नाव | कामाचा प्रकार | कामाचा गट क्र. | निविदा रक्कम (रु) (आकस्मिक खर्च वगळुन) | कामे पुर्ण करण्याचा कालवधी (दिवस) | निविदा शुल्क(रु) | इसाराक्कम रु | कंत्राटदाराचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाथर्डी | मोहोजदेवढे | माती नाला बांध गाळ काढणे | १ | २८०४९३ | ३० | २३६ | २८०५ | अ.नगर जिल्ह्यातील खुल्या वर्गातील पात्र नोंदनीकृत कंत्राटदार |
| २ | पाथर्डी | मोहोजदेवढे | माती नाला बांध गाळ काढणे | २ | २६९११८ | ३० | २३६ | २६९२ | |
| ३ | पाथर्डी | मोहोजदेवढे | माती नाला बांध गाळ काढणे | ५ | २९०६४८ | ३० | २३६ | २९०६ | |
| ४ | पाथर्डी | दगडवाडी | सिमेंट नाला बांध खोलिकरण | १ | २९२६५२ | ३० | २३६ | २९२७ | |
| ५ | पाथर्डी | दगडवाडी | सिमेंट नाला बांध खोलिकरण | २ | २९३०७९ | ३० | २३६ | २९३१ | |
| ६ | पारनेर | कान्हूर पठार | सिमेंट नाला बांध गाळ काढणे | २ | २३४८०९ | ३० | २३६ | २३४८ | |
| ७ | पारनेर | कान्हूर पठार | सिमेंट नाला बांध गाळ काढणे | ४ | २४२१८० | ३० | २३६ | २४२२ | |
| ८ | पारनेर | कान्हूर पठार | सिमेंट नाला बांध गाळ काढणे | ५ | २०२७८७ | ३० | २३६ | २०२८ | |
| ९ | पारनेर | पिंपळगावरोठा | माती नाला बांध गाळ काढणे | २ | १६४१५८ | ३० | २३६ | १६४२ | |
| १० | पारनेर | पिंपळगावरोठा | माती नाला बांध गाळ काढणे | ३ | १७८६३४ | ३० | २३६ | १७८६ | |
| ११ | पारनेर | कातळवेढा | सिमेंट नाला बांध गाळ काढणे | १ | ६९११५ | ३० | २३६ | ६९१ | |
| एकूण | | | | | २५१७७५३ | | | | |

निविदा अटी व निविदेचा सविस्तर कार्यक्रम निविदा फॉर्म / संचासोबत उपलब्ध होईल.

जिमाका /नगर/ जाहि / २११/२०२४-२५

**उप विभागीय कृषि अधिकारी**
**अहिल्यानगर**

# लाभार्थ्यांना बँक खाते आधारकार्डशी संलग्न करुन घ्यावे

नगर – संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण फेब्रुवारी २०२५ पासून डीबीटीद्वारे वितरित करण्यात येणार असल्याने लाभार्थ्यांनी त्यांचे बँक खाते आधारकार्डशी संलग्न करुन घेण्याचे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) अतुल चोरमारे यांनी केले आहे.

लाभार्थ्यांनी योजनेच्या लाभासाठी उघडलेले बँक खाते आधारक्रमांक व मोबाईल क्रमांकासोबत जोडण्यासाठी बँक खाते, आधार व मोबाईल क्रमांक आदी माहिती संबंधित तहसिलात तातडीने जमा करावी. ज्या लाभार्थ्यांचे बँक खाते आधारक्रमांक व मोबाईल क्रमांकांशी संलग्न नाहीत, अशा लाभार्थ्यांना योजनेंतर्गत प्राप्त होणारा लाभ फेब्रुवारी, २०२५ पासून बंद होणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.



# निघा गोव्याच्या रोड ट्रिपला

दोस्तांनो, रोड ट्रिपची मजा काही औरच असते. मस्तपैकी बाईक किंवा गाडी काढायची आणि मित्रमंडळींसोबत सफरीला निघायचं. हा प्रवास प्रत्येकालाच समृद्ध आणि अनुभवसंपन्न बनवतो. वाटेतला निसर्ग खुणावत राहतो. धाब्यावरचं गरमागरम अन्न समाधान देऊन जातं. आपल्याकडे रोड ट्रिपसाठी बरेच पर्याय असले तरी शेजारी गोव्याचं सौंदर्य मात्र नजरेत भरण्यासारखं! समुद्रकिनाऱ्यांनी नटलेल्या या छोट्या राज्यात जाण्याचा फक्त एकच मार्ग नाही. वेगवेगळ्या मार्गांनी तुम्ही तिथे जाऊ शकता. त्यामुळे रोड ट्रीप प्लान करत असाल तर गोव्याला प्राधान्य द्या आणि ही सुंदर भूमी एक्सप्लोअरही करा.

भटकंती

* धारवाडहून गोव्याला जाताना अनमोद घाट लागतो. या प्रवासातली निसर्गाची साथ तुम्हाला मंत्रमुग्ध करुन टाकेल. मान्सून काळात महादायी अभयारण्याच्या परिसरातले धबधबे मन मोहवून टाकतील. इथून तुम्ही उत्तर गोव्यात दाखल व्हाल.
* आंबोली घाटातला रस्ताही खूप सुंदर आहे. दोन्ही बाजूला असणारी झाडी हवाहवासा थंडावा देत राहते. पावसाळ्यात इथलं सौंदर्य अधिकच वाढतं. स्वच्छ आणि सुंदर रस्ते, अधूनमधून दिसणारे धबधबे स्वर्गसुखाचा आनंद मिळवून देतात. पोटपूजा करण्यासाठी सावंतवाडीला थांबा. इथे मस्त मालवणी भोजनाचा आस्वाद घेता येईल. मासे खाणाऱ्यांसाठी हा प्रवास म्हणजे जिभेचे चोचले पुरवण्याची अनोखी पर्वणीच.
* हिरवीगार शेतांमधून जाण्याचा आनंद लुटायचा असेल तर चोरला घाटाचा मार्ग निवडा. पावसाळ्यात उंचावरून कोसळणारा सूरला धबधबा डोळ्यात साठवून घेता येईल. या मार्गावरही भरपूर खवय्येगिरी करता येईल. हा प्रवास शक्यतो बाईकने करा. यामुळे निसर्गाची भव्यता अनुभवता येईल.

**आयुष्यात धाडसी निर्णय घेतले तर ते यशस्वीपणे पार पाडणारी युवा पिढी आपण आजूबाजूला बघतो. सध्या जीवाचा आटापिटा करून नोकरी शोधली तरी ती टिकवून ठेवणे हे कसोटीचे काम आहे. अशातच मिळलेली नोकरी सोडून स्वत:चा व्यवसाय सुरु करायला जिद्द लागते. अशीच जिद्द दाखवली मुझफ्फरपूरच्या विकास कुमार या तरूणाने.**

# विकासची यशस्वी शेती

शहरात जाऊन नोकरी करूनच पैसे कमावता येतात असे नाही. सीए आणि एमबीए केले तरंच आयुष्यात स्थिरता येते असेही नाही. परंतु, शेतीत नव्या कल्पना राबवून कष्ट केले, तर उत्पन्नही वाढते आणि लोकांचे कल्याणही होते. याच उद्देशाने मुझफ्फरपूरमधील विकास कुमार या तरुणाने शेतीमुळे प्रेरित होऊन सीएची तयारी सोडून मसाला शेती करायला सुरूवात केली.

अचिव्हर

विकास कुमारला सुरुवातीला अनंत अडचणींचा सामना करावा लागला; पण हळूहळू त्याचे उत्पन्न वाढत गेले. सध्या तो दरमहा किमान एक ते दीड लाख रुपये कमवत आहे. शेतीतून उत्पन्न वाढवण्यासाठी त्याने रोपवाटिकाही चालू केली. त्यात मसाल्याच्या रोपांचीही विक्री सुरू झाली. या कामामुळे त्याला आनंदही मिळतो आणि व्यवसायाला गती मिळाली. विकास सांगतो, की गावात कुटुंबासोबत राहणे आणि एवढी कमाई करणे पुरेसे आहे. सध्या तो मोठ्या प्रमाणात मसाले पिकवण्याची तयारी करतो आहे.

मसाल्यांच्या लागवडीमुळे विकासचे आयुष्य बदलून गेले. तो रोहुआ गावचा रहिवासी आहे. हा व्यवसाय पूर्णत्वास आणण्यासाठी आधी त्याने गावात प्रयोग केला. त्याने वाणिज्य शाखेतून पदवी घेतली. पदवी घेऊन सीए होण्याचे त्याचे स्वप्न होते; पण वडील शेतकरी आहेत. शेती आणि बागकामातील त्यांची मेहनत पाहून विकासचा हेतू बदलला. त्याने इन्सीएक्ची नोकरी सोडून दिली. घरच्या घरी शेती आणि बागकाम पुढे नेण्यासाठी त्याने मसाल्यांवर संशोधन केले.



विकासने सेलेरी, दालचिनी, वेलची, लवंगा यासह सर्व प्रकारच्या मसाल्याच्या वनस्पती बंगालमधून आयात केल्या आणि त्यांची लागवड करून उत्पन्नातही वाढ केली. मसाल्यांची लागवड ही एक आगळीवेगळी गोष्ट आहे. आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यांना विकासने लावलेल्या मसाल्याच्या रोपाची माहिती मिळताच रोपांची मागणी वाढू लागली. मसाल्याच्या रोपांची मागणी पाहून त्यांनी रोपवाटिका सुरू केली. आता किमान एक ते दीड लाख रुपये एवढे त्याचे मासिक उत्पन्न आहे. विकासने केलेले प्रयोग बघता या उत्पन्नात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.




फंडू एसएमएस

छुपाने लगा हूं आजकल
कुछ राज अपने आप से
सुना है...
कुछ लोग मुझको
मुझसे ज्यादा जानने
लगे हैं।

ये वादा है हमारा,
ना छोडेंगे साथ
तुम्हारा। जो गए तुम
हमको भूल कर, ले
आऐंगे पकड कर हाथ
तुम्हारा।

उनकी छत पर गये थे
हम कटी हुई पतंग लूटने,
पगली से नजरें मिल गयी
तो कहने लगी, सुनो,
तुम पतंग लूटने आये हो
या दिल...

बी अ‍ॅलर्ट

## माहितीच्या सुरक्षेसाठी...

व्हॉट्स अ‍ॅपच्या सुरक्षेवर नाना प्रश्न उपस्थित होतात. खबरदारी घेतली नाही तर व्हॉट्स अ‍ॅप चॅट्स अनोळखी माणसांपर्यंत पोहोचू शकतात. एखादा नंबर बंद करताना योग्य ती खबरदारी घेतली नाही तर हा धोका उद्भवू शकतो. म्हणूनच नंबर बंद करण्याआधी सर्व व्हॉट्स अ‍ॅप डाटा नव्या क्रमांकात मायग्रेट करा. वापरात नसणारा नंबर रिसायकल करून मोबाईल कंपन्या तो नव्या युजरला देतात. अशा परिस्थितीत तुम्ही त्यातलं व्हॉट्स अ‍ॅप चॅट मायग्रेट केलं नसेल तर नवा युजर या नंबरचे चॅट्स, फोटोज, व्हिडिओ अ‍ॅक्सेस करू शकतो. त्यामुळे नंबर बदलताना योग्य ती खबरदारी घ्यायला हवी.



बी अपडेटेड

## अस्सल आयफोन कोणता?

सध्या बाजारात बनावट वस्तूंचा सुळसुळाट पहायला मिळतो. एखादा बनावट आयफोन तुमच्या हाती पडू शकतो. खरेदी केलेला आयफोन अस्सल आहे की बनावट हे जाणून घेता येतं. यासाठी तुम्ही फोनचा आयएमईआय क्रमांक तपासून बघू शकता. प्रत्येक स्मार्टफोनला १५ ते १७ आकड्यांचा एक क्रमांक दिला जातो. त्याला आयएमईआय क्रमांक असतं म्हणतात. हा क्रमांक जाणून घेण्यासाठी फोन सेटिंग्जमध्ये जनरलमध्ये जाऊन अबाउट ऑप्शन बघा. इथे हा क्रमांक दिसतो. हा क्रमांक नसल्यास तुमचा आयफोन बनावट असू शकतो. आयफोनच्या बाह्यरुपाकडेही लक्ष द्या. इथे काही फरक दिसू शकतो. तसंच ऑपरेटिंग सिस्टिमही तपासून बघा. या माध्यमातून तुम्ही बनावट फोन ओळखू शकता.



# चविष्ट रोजगारसंधी

नोकरी करून केवळ एकाच कुटुंबाचं पोट भरण्यापेक्षा व्यवसाय करून १० कुटुंबांचं पोट भरावं असं म्हटलं जातं. पण नेमका कोणता व्यवसाय करावा हे ठरवणंही सोपं नसतं. त्यातल्या त्यात कमी भांडवलात सुरू होऊ शकणारा, कमी जोखमीचा आणि हमखास परतावा देणारा व्यवसाय म्हणून काजू प्रक्रिया उद्योगाचा उल्लेख करावा लागेल.



काजू फळ आणि बी अशा अवस्थेत झाडावर तयार होतो. काजूच्या फळाला कॅश्यू अ‍ॅपल असं म्हटलं जातं. या फळापासून फेणी (एक प्रकारचे मद्य), सरबत, स्क्वॅश, वाईन असे अनेक पदार्थ तयार करता येतात. काजूचं फळ इतकं उपयुक्त असूनही त्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचं प्रमाण फारच कमी असल्याने ते मोठ्या प्रमाणावर वाया जातं. त्यामुळे तरुणांना या व्यवसायात मोठी संधी आहे. काजूच्या फळाच्या खालीच काजू बी असते. काजू बीमध्ये काजूगर म्हणजेच आपण नेहमी पाहतो ते काजू असतात. काजूगरावर टरफलाचं आवरण असतं. या टरफलात कॅश्यूनट शेल लिक्वीड (सीएनएसएल) हे तेल असतं. हे तेल ऑईलपेंट किंवा लाकडाच्या पॉलीशमध्ये वापरलं जातं. टरफल काढून काजू आपल्या हातात पडण्यासाठी त्यावर बरीच प्रक्रिया करावी लागते.

रोजगारवाटा

झाडावरून काढलेलं बी दमट असल्याने दुपारी बारा ते चार या कालावधीत तीन-चार दिवस कडक उन्हात वाळवलं जातं. त्यानंतर ते व्हेसलमध्ये टाकून स्टीमरमधून ठराविक तापमानाची वाफ ठराविक दाबाने सोडून २० मिनिटांसाठी वाफवलं जातं. वाफवल्यावर बी ड्रायरमध्ये आठ ते दहा तास वाळवलं जातं. वाफवून वाळवल्यावर बियांचं टरफल सहज निघतं आणि टरफलातील तेल गराला लागण्याचं प्रमाण कमी होतं. वाळवलेलं बी कटरद्वारे फोडून गर वेगळा काढला जातो. या गरावर लाल रंगाचा पापुद्रा असतो. हा पापुद्रा काढल्यावर पक्का माल अर्थात खाण्यायोग्य काजू हाती लागतो. चार किलो काजू बी पासून एक किलो काजू मिळतात. पापुद्र्याचा वापर कोंबड्यांच्या खाद्यामध्ये केला जातो. टरफल भट्टीमध्ये इंधन म्हणून वापरता येतं किंवा त्यापासून तेलही काढता येतं. काजूपासून विविध स्वादांचे काजू तयार करता येतात.

पाच ते सहा कामगारांना सोबत घेऊन दिवसाकाठी किमान ३० किलो काजूबियांवर प्रक्रिया करता येऊ शकते. सर्व खर्च वजा जाता एका किलोमागे साधारणपणे २५ रूपयांचा नफा मिळू शकतो. कच्चा माल विकत घेऊन संबंधितांनाच पक्का माल पुरवायचा असल्याने मार्केटिंगची वेगळी डोकेदुखी सांभाळायची गरज उरत नाही. हा उद्योग उभारण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री, विविध प्रक्रियांचं ज्ञान, भांडवल उभारण्यासाठी मिळू शकणारं अर्थसाह्य त्यासाठी लागणारा प्रकल्प अहवाल (प्रोजेक्ट रिपोर्ट), कर्मचाऱ्यांचं प्रशिक्षण, तयार होणाऱ्या काजूंची प्रतवारी करणं, काजूपासून खारे, मसाला काजू, काजू कतली आदी तयार करणं, या सर्व बाबींचं मार्गदर्शन काजूप्रक्रियेसाठी लागणारी यंत्रं तयार करणाऱ्या कंपन्यांतर्फे केलं जातं.

अ‍ॅप वर्ल्ड

## ऑनलाईन फसवणुकीचा नवा फंडा


हॅकर्स ऑनलाईन स्कॅम किंवा फसवणुकीच्या वेगवेगळ्या कल्पना लढवताना दिसतात. ऑनलाईन शॉपिंग साईटच्या माध्यमातून फसवणूक करण्याचा मार्ग शोधल्यानंतर आता इन्स्टाग्रामच्या माध्यमातून फसवणूक होत असल्याचा नवा प्रकार समोर आला आहे. इन्स्टाग्राम रिल्स बघताना बनावट जाहिरातींच्या माध्यमातून पैसे उकळले जात आहेत. एक महिला कर्जाशी संबंधित जाहिरातीला भुलून हॅकर्सच्या जाळ्यात अडकली आणि तिच्याकडून हजारो रुपये उकळण्यात आले. त्यामुळे सोशल मीडियावरील कोणत्याही जाहिरातीवर आंधळेपणाने विश्वास ठेऊ नये, असं आवाहन केलं जात आहे.



# फक्त नवरीनेच का सुंदर दिसावं?

लग्न हा नवरा आणि नवरी दोघांनीही सुंदर दिसण्याचा दिवस. या खास दिवसासाठी नवरी अनेकदा तयारी करताना आणि त्यावर अगदी चर्चा करतानाही दिसते. गेल्या काही वर्षांपासून हा ट्रेंड बदलला असून आता आपल्या लग्नासाठी नवराही कॉस्मेटिक प्रक्रिया करताना वा त्याबाबत चर्चा करताना दिसून येतो. या दिवशी आपण छान दिसावे, त्वचेवर चमक असावी, प्रत्येकाची नजर आपल्याकडे जावी असा लूक, सौंदर्य खुलून दिसावे असे प्रत्येकालाच वाटते. लग्नाच्या दिवशी फक्त वधूकडेच सगळ्यांची नजर न जाता वराकडे देखील लोकांनी आश्चर्याने पाहिले पाहिजे. यासाठीच वराने देखील लग्नापुर्वी त्वचेची योग्य देखभाल घेणे गरजेचे आहे.

ग्रुमिंग



* **केमिकल पील ट्रीटमेंट :** केमिकल पील ट्रीटमेंट, केमेक्सफोलिएशन यामध्ये त्वचेच्या थरांवर उपचार केले जातात. विशेषत: चेहऱ्यावर कॉस्टिक केमिकल किंवा ॲसिड वापरून त्वचेचा बाह्य थर काढून टाकला जातो. याचा वापर सुरकुत्या आणि डाग दूर करण्यासाठी केला जातो. यामध्ये ठराविक प्रकारचे द्रावण चेहरा, मान आणि हातांवर लावले जाते. ज्यामुळे त्वचेचा खराब झालेला थर निघून जातो.
* **हायड्रा फेशियल :** ज्याला hydra dermabrasion म्हणूनही आळखले जाते, ही एक नॉन-इन्व्हेसिव्ह प्रक्रिया आहे. ती रोसेसिया, मुरुम आणि ब्लॅकहेड्स सारख्या त्वचेच्या काही समस्यांवर उपचार करण्यासाठी वापरली जाते. हायड्रा फेशियल हे औषधीयुक्त हायड्रेशन फेशियल आहे. कोरडी त्वचा किंवा संवेदनशील त्वचा असलेल्या व्यक्तींसाठी ही प्रक्रिया त्वचा हायड्रेट करणे, नितळ आणि चमकदार त्वचा मिळविण्यासाठी उपयुक्त ठरते. या प्रक्रियेमध्ये विशिष्ट उपकरणाचा वापर केला जातो. या उपचारामध्ये त्वचा खोलवर स्वच्छ करुन ते त्वचेच्या एक्सफोलिएशन आणि हायड्रेशन केले जाते.
* **मायक्रोडर्माब्रेशन :** मायक्रोडर्माब्रेशनमध्ये त्वचेच्या त्वचेचा बाह्य स्तर एक्सफोलिएशनद्वारे काढून टाकला जातो, ज्यामुळे त्वचा निरोगी आणि चमकदार दिसते. मायक्रोडर्माब्रेशन उपचार त्वचेचे कोलेजन घट्ट होण्यास मदत करते. कोलेजन हे त्वचेतील एक प्रथिन आहे जे त्वचेला टवटवीत आणि निरोगी बनवते ज्यामुळे रंग उजळ होतो त्वचा देखील तरुण दिसते. वाढत्या वयाबरोबर कोलेजनचे प्रमाण कमी होते आणि त्यामुळे त्वचा निस्तेज आणि असमान दिसते. यात टाके घातले जात नसल्याने व्रण राहण्याची चिंता नसते. तसंच यात वेदना होत नाहीत.

# कुरकुरीत गार्लिक पोटॅटो चाट

दोस्तांनो, हॉस्टेलमध्ये काही चटपटीत आणि वेगळं खावंसं वाटलं तर गार्लिक पोटॅटो चाट बनवून बघा. मस्त कुरकुरीत पोटॅटो चाट मित्रमंडळींनाही आवडेल. मग काय, कामाला लागू या?



साहित्य : दोन ते तीन मध्यम आकाराचे बटाटे, दोन चिरलेल्या हिरव्या मिरच्या, अर्धा चमचा लसूण पेस्ट, (लसूण पाकळ्या सोलून वाटून घ्या.), एक कप दही, तेल, चमचाभर मसाला दाणे, दोन चमचे तिखट, चवीनुसार मीठ, चाट मसाला आणि जिरे पूड.

झटपट रेसिपी

कृती : बटाटे अर्धवट उकडून लांबट तुकडे करुन तळून घ्या. आता कढईत थोडं तेल तापायल ठेवा. तेल गरम झाल्यानंतर त्यात हिरव्या मिरच्या आणि लसूण पेस्ट घालून परतून घ्या. पाच मिनिटं मंद आचेवर शिजवा. आता त्यात तळलेले बटाटे घाला. आता दह्यामध्ये तिखट, मीठ, जिरेपूड घाला. चांगलं मिसळून घ्या. तळलेले बटाटे या दह्यात घाला. नीट हलवून घ्या. चाट मसाला आणि मसाला दाणे घालून सजवा. दही नसेल किंवा नको असेल तर टॉमेटो सॉसही घालू शकता.

स्मार्ट टिप्स

## फेक पासपोर्ट, फेक वेबसाईट्स

परदेशात जाण्यासाठी पासपोर्ट लागतो. पासपोर्ट काढून घेणं बरंच जिकिरीचं असतं. बरीच मोठी प्रक्रिया पार पाडावी लागते. अशा वेळी एजंट्सची मदत घेतली जाते. मात्र सध्या काही वेबसाईट्स बनावट पासपोर्ट तयार करत असल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळे केंद्र सरकारने लोकांना जागरूक करण्यासाठी अशा वेबसाईट्सची यादीच जारी केली आहे. या वेबसाईट्स पासपोर्ट तयार करून देण्याच्या नावाखाली युजर्सकडून त्यांची वैयक्तिक माहिती गोळा करत आहेत. तसंच त्यांच्याकडून मोठी रक्कमही वसूल करत आहेत. त्यामुळे अशा वेबसाईट्सपासून सावध राहण्याची आवश्यकता आहे.



# ट्रेंडी पोलो शर्ट्स्

मित्रांनो, राउंड नेक टी-शर्ट घालून कंटाळला असाल तर पोलो शर्टचा पर्याय निवडायला हरकत नाही. पोलो शर्ट म्हणजे टी-शर्टचं क्लासी व्हर्जन. हे शर्ट देखील तितकेच कॅज्युअल आणि आरामदायी असतात. एकीकडे राउंड नेक टी-शर्ट फक्त कॅज्युअल ऑकेजन्सना शोभून दिसत असताना बऱ्यापैकी फॉर्मल वाटणारा पोलो शर्ट मात्र कुठेही घालता येतो. स्टायलिश असल्याने राउंड नेकच्या तुलनेत पोलो शर्टची सध्या चलती आहे. कोणत्याही बॉटमवर मॅच होणं ही याची खासियत. वेगवेगळ्या पद्धतींनी पोलो शर्ट कसा कॅरी करायचा याविषयी...

फॅशन पॅशन

* स्पोर्टी लूकसाठी पोलो शर्टसोबत खाकी शॉर्ट्स घाला. त्यावर नो शो सॉक्स आणि बोट शूज उठून दिसतील. ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉच अशा ॲक्सेसरींनी तुमचा लूक खुलवा.
* कॅज्युअल ऑकेजनसाठी पोलो शर्टसोबत चिनोज किंवा लिनन ट्राउझर्स घालता येतील. नो शो सॉक्स विथ लोफर्ससोबतच ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉच आणि गॉगल अशा ॲक्सेसरीज परफेक्ट लूक देऊन जातील.
* कॅज्युअल सूट लूकसाठी पोलो शर्टसोबत लाईट ग्रे रंगाचा सूट निवडा. ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉचसह नो शो सॉक्स आणि लोफर्स कॅरी करा.
* लेअरिंगसाठीही पोलो शर्ट बेस्ट आहे. या शर्टवर गडद रंगाची डेनिम आणि कार्डिगॅन घाला. ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉच आणि लोफर्स घालून हा लूक सजवा.
* गडद डेनिमवर पोलो शर्ट घालून त्यावर हेरिंगबोन जॅकेट घाला. ब्राऊन बेल्ट, कॅज्युअल वॉच आणि बूटसह हा लूक खुलवा.



# धाकधूक वाटते आहे

मी २७ वर्षांची युवती असून गेल्या दोन वर्षांपासून एका मुलाच्या प्रेमात आहे. सुरूवातीपासूनच त्याच्याशी लग्न करण्याची माझी इच्छा होती. मधल्या काळात आमचे आई-बाबा एकमेकांना भेटले. आता लवकरच आमचं लग्न होणार आहे. पण का कोण जाणे, निर्णय घ्यायला काही वेळ घ्यावा असं मला वाटतंय. हे लग्न वर्षभर पुढे ढकलावं असा माझा विचार आहे. मला त्याच्याशी लग्न करायचं होतं. पण आता सगळं जमून आलेलं असताना मनात धाकधूक आहे. मी काय करू?



मॅच मेकिंग

उत्तर : लग्नाच्या आधीची अस्वस्थता ही अगदी सामान्य बाब आहे. लग्नानंतर आयुष्य आमूलाग्र बदलतं. प्राधान्यक्रम ठरवावे लागतात. त्यातही मुलींना आपलं घर सोडून नव्या घरी जावं लागतं. नवी नाती स्वीकारावी लागतात. प्रेमविवाह असो किंवा ठरवून केलेलं लग्न, मुलांपेक्षा मुलींवर जास्त ताण येतो. आता आवडत्या मुलासोबत तुझं लग्न होत आहे. त्यामुळे त्याच्याशी मनातील या सर्व भावनांबद्दल मोकळेपणाने बोल. तुझ्या अपेक्षा सांग. मनातली भीती, अस्वस्थता नेमकी कशासाठी आहे हे जाणून घे. कारण यामागेही अनेक कारणं असतात. तुला विवाह समुपदेशकांची मदतही घेता येईल. मनात नकारात्मक विचार येऊ देऊ नको. प्रत्येक बदलाकडे सकारात्मकतेने बघ. तुझं नातं नक्कीच फुलेल. दुसरं म्हणजे तो मुलगा तुला का आवडतो आणि अगदी ऐनवेळी तुला कशासाठी वेळ हवा आहे याचं विश्लेषण कर. यामुळे ताणाचं नेमकं कारण कळेल. कुढत राहून प्रश्न सुटणार नाहीत.

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेच्या चेअरमनपदी समीर बोरा तर व्हा.चेअरमनपदी अभय पितळे





नगर – सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी समीर अरूण बोरा यांची तर व्हा.चेअरमनपदी अभय अनिल पितळे यांची निवड झाली आहे. पतसंस्थेच्या नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीनंतर पदाधिकारी निवडीसाठी जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली निवडणूक निर्णय अधिकारी सहकार विभागाचे विक्रम मुटकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नवनिर्वाचित संचालकांची बैठक झाली. या बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

चेअरमनपदासाठी समीर बोरा यांच्या नावाची सूचना मावळते चेअरमन संतोष गांधी यांनी मांडली, त्यास संचालक सुवर्णा डागा यांनी अनुमोदन दिले. व्हा. चेअरमनपदासाठी अभय पितळे यांच्या नावाची सूचना संचालक विनय भांड यांनी मांडली त्यास ॲड. आनंद फिरोदिया यांनी अनुमोदन दिले. यावेळी संचालक शैलेश गांधी, चेतन भंडारी, विनित बोरा, ॲड.आनंद फिरोदिया, सौ.सुवर्णा डागा, सौ. प्रिती बोगावत, विनय भांड, शरद गोयल, माजी चेअरमन शांतीलाल गुगळे, माजी तज्ज्ञ संचालक सी.ए. परेश बोरा, सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी, मार्केट यार्ड शाखेचे शाखाधिकारी मनोज लुणिया आदी उपस्थित होते.

निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जैन ओसवाल समाजाचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सी.ए. अशोक पितळे यांनी या निवडीनंतर संस्थेत येऊन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सहकार विभागाचे विक्रम मुटकुळे यांचा संतोष गांधी यांनी सत्कार केला.

संतोष गांधी म्हणाले, जवळपास दीड वर्षे काम करताना सर्व सहकारी संचालकांचे चांगले सहकार्य लाभले. अनेक नवीन योजना राबविण्यात आल्या. मधल्या काळात काही अडचणी निर्माण झाल्या. परंतु सर्वांनी साथ दिल्याने संस्थेची विश्वसनीयता कायम राखण्यात यश आले. दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी म्हणायचे, सरकारे आएगी जाएगी, पार्टिया बनेगी बिगडेगी, संविधान रहना चाहीए, देश रहना चाहिए. त्याच प्रमाणे चेअरमन येतील जातील, आपल्या संस्थेच्या प्रगतीचा आलेख कायम उंचावत राहीला पाहिजे.

यावेळी सुवर्णा डागा, शैलेश गांधी यांनी संतोष गांधी यांच्या कामाचे कौतुक करून नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, आताच्या स्पर्धेच्या युगात अत्याधुनिक बँकिंग सुविधा देणे आवश्यक आहे. यासाठी पतसंस्था नेहमीच प्रयत्न असते. ठेवी वाढवतानाच योग्य कर्ज वितरणासाठी नूतन पदाधिकारी विशेष प्रयत्न करतील असा विश्वास आहे. सर्व सभासदांनी संस्थेच्या विविध योजनांचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

समीर बोरा म्हणाले की, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा यांनी अतिशय दूरदृष्टीने स्थापन केलेल्या पतसंस्थेच्या चेअरमनपदाची संधी मिळणे हा माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. याआधी संस्थेत व्हाईस चेअरमन म्हणून योगदान दिले. संस्था उत्कृष्ट आर्थिक कामगिरी, अत्याधुनिक बँकिंग सुविधा, सभासद, ग्राहक हितासाठी नावाजली जाते. एनपीए आणखी कमी करताना सभासदांना १५ टक्के लाभांशाची परंपरा कायम राखण्याचा मानस आहे. संस्थेचे ३७ कोटींचे सोने तारण कर्ज आहे. याशिवाय सोने खरेदीसाठी कर्ज ही अभिनव योजनाही संस्थेने सुरू केली आहे. सर्व सहकारी संचालकांना सोबत घेऊन संस्थेचा नावलौकिक आणखी वृध्दींगत होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील

सूत्रसंचालन सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांनी केले तर नूतन व्हाईस चेअरमन अभय पितळे यांनी आभार मानले. यावेळी बोरा व पितळे मित्र परिवार, जॉईज, खिस्त गल्ली, नवीपेठ येथील मित्र परिवाराने फटाके वाजवून आनंदोत्सव साजरा केला.

# एमआयडीसीच्या विस्ताराकरिता शासनाने जागा उपलब्ध करावी

## सुविधा देऊन ग्रामपंचायत कर व वीज दर कमी करा; हरजितसिंह वधवा यांचे ना. उदय सामंत यांना निवेदन



एमआयडीसीच्या विस्ताराकरिता जागा उपलब्ध करुन द्यावी तसेच विविध सुविधा देऊन ग्रामपंचायत कर व वीज दर कमी करा, या मागणीचे निवेदन उद्योग मंत्री उदय सामंत यांना देताना हरजितसिंह वधवा.

नगर – शहराच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीकोनाने अहिल्यानगर मधील एमआयडीसीत सुविधा निर्माण करुन, उद्योग विस्ताराकरिता जागा उपलब्ध करुन द्यावी व स्वतंत्र्य पोलीस स्टेशनची मागणी महाराष्ट्र मेकॅनिकल इंजिनिअर असोसिएशनचे हरजितसिंह वधवा यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी उद्योजक आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, सुमित लोढा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवांगे आदींसह उद्योजक उपस्थित होते.

ना. सामंत यांची भेट घेऊन शहराच्या एमआयडीसीमधील प्रश्नांबाबत वधवा यांनी लक्ष वेधले. यावेळी सामंत यांनी संबंधित एम आयडीसीच्या अधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करुन सदरील प्रश्न सोडविण्याबाबत सूचना केल्या.

शहरातील औद्योगिक वसाहत येथे भूखंडाची अत्यंत आवश्यकता आहे. उद्योग विस्ताराकरिता भूखंड उपलब्ध नसल्याने मोठे प्रकल्प येण्यास अडचण येत आहे. वन विभागाकडून ६०० एकर जमीन एमआयडीसीसाठी अधिग्रहण करण्यास मंजूरी मिळालेली असताना, त्याला चालना दिल्यास येथील उद्योग विस्ताराकरिता जागा उपलब्ध होऊ शकणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हंटले आहे.

एमआयडीसीत मोठ्या प्रमाणात चोऱ्या व इतर गुन्हेगारी वाढली आहे. यासाठी स्वतंत्र्य पोलीस स्टेशनची गरज निर्माण झाली आहे. ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या एमआयडीसीच्या उद्योजकांकडून ग्रामपंचायत मोठ्या प्रमाणात टॅक्स वसूल करत आहे. तसेच विद्युत महावितरणने देखील मोठ्या प्रमाणात वीज दरवाढ केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये उद्योजकांना मोठ्या आर्थिक प्रश्नांचा सामना करावा लागत आहे. ग्रामपंचायतकडून वसूली केले जाणारे टॅक्स कमी करावे व विद्युत महावितरणकडून उद्योजकांना इतर राज्यांप्रमाणे वीज दरात सवलत देण्याची मागणी उद्योजक वधवा यांनी केली आहे.




## तक्षिला विद्यालयात ध्वजवंदन : संविधानाच्या उद्देशिकाचे सामुहिक वाचन

भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अहिल्यानगर मधील जामखेड रोडवरील तक्षिला विद्यालयात प्राचार्य जयश्री मेहेत्रे यांच्या हस्ते ध्वजाला मानवंदना देऊन राष्ट्रगीत व ध्वजगीत सादर झाले. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच देशभक्तीपर गीत, नृत्यही सादर केले. विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. भारत एक सार्वभौम लोकशाही राष्ट्र आहे. संविधानामुळेच प्रत्येक भारतवासी आपले मूलभूत हक्क व कर्तव्याची जाणीव ठेवून वागतो व जगतो असे त्या म्हणाल्या. याप्रसंगी संविधानाच्या उद्देशिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

# कोणतीही पूर्वसूचना न देता, ठराव घेऊन निलंबन माजी सैनिकाच्या कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ

## मुलाचे बँकेतील बेकायदेशीर निलंबन रद्द होण्यासाठी कुटुंबीयांचे उपोषण



माजी सैनिक सुंदर मेहेर यांच्या कुटुंबीयांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर मुलाबाळांसह उपोषण सुरु केले आहे.

नगर – कोणतीही पूर्व सूचना व नोटीस न देता पुन्हा निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेचे क्लार्क नितीन मेहेर यांच्यावरील बेकायदेशीर निलंबन रद्द होण्यासाठी माजी सैनिक असलेल्या सुंदर मेहेर यांच्या कुटुंबीयांनी जिल्हाधिकारी कार्यालया समोर मुलाबाळांसह उपोषण सुरु केले आहे.

नितीन मेहेर यांच्या कुटुंबीयांनी सप्टेंबरमध्ये निलंबन रद्द होऊनही पुन्हा कामावर रुजू करुन घेण्यास टाळाटाळ होत असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण केले होते. यानंतर त्यांना बँकेत कामावर हजर करुन घेण्यात आले. मात्र ३० सप्टेंबर २०२४ च्या मीटिंगमध्ये पारनेर तालुका सैनिक सहकारी बँक चेअरमन, संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मेहेर यांच्या निलंबनाचा ठराव घेतला. त्यानंतर दोन ते अडीच महिन्यानंतर १७ डिसेंबर २०२४ ला जामखेड शाखा येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निलंबनाचे पत्र पाठविले. कोणतीही पूर्वसूचना व नोटीस न देता बेकायदेशीर पध्दतीने आकसापोटी ठराव घेऊन नितीन मेहेर यांचे निलंबन करण्यात आले असल्याचे मेहेर कुटुंबीयांनी आरोप केला आहे.

कुटुंबीयांवर अन्याय करण्यात आला असून, माजी सैनिकाचा मुलगा असलेल्या नितीन मेहेर याला कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहासाठी एकमेव सदर नोकरीचे साधन आहे. त्यांच्यावर सर्व कुटुंबीय अवलंबून असून, त्याचे निलंबन करण्यात आल्याने कुटुंबीयांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे उपोषणकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

बँकेच्या व्यवस्थापनाने तात्काळ मेहेर यांचे निलंबन रद्द करून, त्यांना कामावर हजर करून घ्यावे, निलंबन काळातील पगार शासन नियमाप्रमाणे त्यांच्या बँक खात्यात जमा करावे, दिवाळी बोनस देण्याची मागणी करण्यात आली आहे. या उपोषणात माजी सैनिक सुंदर मेहेर, मंदा मेहर, नितीन मेहेर, सीमा मेहेर यांच्यासह संपूर्ण कुटुंबीय मुलाबाळांसह बसले आहे.

# बेघरांना घरकुल योजनेसाठी बोल्हेगावातील २ हेक्टर ५ आर पडिक जागा देण्याची मागणी

## सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन



मौजे बोल्हेगाव गावठाण येथील २ हेक्टर ५ आर. जागा घरकुल योजनेसाठी मिळण्याच्या मागणीसाठी सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना फाऊंडेशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे आदी.

नगर – मौजे बोल्हेगाव गावठाण येथील २ हेक्टर ५ आर. जागा घरकुल योजनेसाठी मिळण्याच्या मागणीसाठी सत्यशोधक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाऊंडेशनच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी फाऊंडेशनचे उपाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, कर्मा वावरे, साहेबराव काते, सुनील सकट, अतुल काते, अलका कांबळे, अक्षय गवळी, सखुबाई बोरगे आदीसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, मागासवर्गीय व अनुसूचित जाती जमातीचे ५० कुटुंब गांधीनगर बोलेगाव गावठाण येथे सुमारे १५ ते २० वर्षापासून भाडेतत्त्वावर रहिवास करत आहे. मौजे बोल्हेगाव गावठाण येथील २ हेक्टर ५ आर. ही जागा महाराष्ट्र शासन यांच्या ताब्यात असून पुढील ती पडीक आहे त्यामुळे गोरगरिबांच्या घरकुल योजनेसाठी रमाई आवास योजनेसाठी उपयोगात येऊ शकते तरी सदर कुटुंबे हे बेरोजगार आहे. त्यामधील काही कुटुंबातील व्यक्ती हे भंगार गोळा करतात, मजुरीचे काम करतात, हमालीचे काम करतात असे वेगवेगळ्या प्रकारचे कामे करून आपली उपजीविका चालवीत आहे. परंतु त्यांना राहण्यासाठी स्वतःचे घर नसून हे भाडेच्या घरात राहून भाडे भरावे लागतात तरी त्यांच्या उपजीविकेत पैसे कधी मिळणार तर कधी मिळत नाही अशा परिस्थितीत भाडे मात्र भरावे लागतात व त्यांना परवडत नाही. त्यामुळे बोल्हेगाव गांधीनगर येथे महाराष्ट्र शासनाच्या नावे असलेली पडीक जागा ही रमाई आवास योजना साठी राबवण्यात यावी त्यामुळे गोरगरीब जनता असून त्यांना स्वतःचे व हक्काचे राहण्यासाठी घर मिळतील अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# नाशिक व पुणे येथे मोफत मराठा वधू-वर मेळावे

## अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्थेचा उपक्रम

नगर – अखंड मराठा समाज व मराठा सोयरीक संस्था ह्यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक शहर व पुण्यामध्ये खेड राजगुरुनगर येथे मोफत मराठा वधू–वर मेळावे आयोजित केले असल्याची माहिती विकास भागवत, मराठा सोयरीक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पांडुरंग कुटे, खेडच्या मनीषाताई सांडभोर, डॉ. संजयकुमार गायधनी, डी. जी. पाटील, शरद जगताप, योगेश पाटील, जयश्री अशोक कुटे यांनी दिली आहे.

अखंड मराठा समाज, नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज व मराठा सोयरीक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक शहरात २ फेब्रुवारी रोजी दु.१२ वाजता, रावसाहेब थोरात सभागृह, (चतझ हॉल) गंगापूर रोड, नाशिक शहर येथे ९३ वा व पुणे जिल्ह्यात ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता राजगुरुनगर, खेड, जुना घाट, हॉटेल साईराज मंगल कार्यालय येथे ९४ वा मोफत वधू वर मेळावे आयोजित केले आहेत.

या नाशिकमधील मेळाव्यासाठी प्रमुख पाहुणे महाराष्ट्राचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे तर प्रमुख उपस्थिती म्हणून चतझ संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुनील उत्तमराव ढिकले आणि संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांची असणार आहे.

आतापर्यंत संस्थेकडून चार हजार पेक्षा जास्त लग्न जमलेले आहेत. त्यापैकी ६१३ लग्न हे विधवा, विधुर, घटस्फोटीत यांचे झालेले आहेत. ९२ मोफत वधू वर मेळावे घेतलेले आहेत. मराठा सोयरीक संस्था ही गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक भावनेतून लग्न जमवण्याचे हे कार्य करत आहे. या दोन्ही मेळाव्यासाठी संपूर्ण राज्यातून, विविध जिल्ह्यातून अनेक वधू–वर पालक उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यामध्ये येताना मुला मुलींनी स्वतः पालकांसोबत येऊन बायोडाटा व आधार कार्ड झेरॉक्स आणणे गरजेचं आहे. अगोदर नाव नोंदणी करण्याची गरज नाही डायरेक्ट मेळाव्यात येऊन नाव नोंदणी करता येईल. अधिक माहितीसाठी संपर्क ८४५३९०२२२२ या नंबर वर संपर्क करावा. या मेळाव्यामध्ये समोरासमोर स्थळे बघून एकमेकांसोबत बोलण्याची संधी मिळणार आहे. पालकांनी दोन्ही मेळाव्यांचा लाभ घ्यावा असे आवाहन ज्ञानेश्वर कवडे, प्रा.शंकरराव सोमवंशी, प्रा.राजाराम मुंगसे, डॉ.प्रतापराव कोठावळे पाटील, चंद्रभान मते, शिवाजी हांडोरे, चेतन शेलार, धनंजय घोरपडे, चिंतेश्वर देवरे, दिपाली चव्हाण यांनी केले आहे.

# विनायकराव देशमुख कुशल संघटक : ना. राधाकृष्ण विखे



जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांचा सत्कार करताना विनायकराव देशमुख, बुऱ्हानगरचे सरपंच रावसाहेब कर्डिले, रवींद्र देशमुख, मुकुल देशमुख, हर्षवर्धन देशमुख व श्री.वाघ दिसत आहेत.

नगर – विनायकराव देशमुख हे कुशल संघटक असून त्यांच्या संघटनात्मक अनुभवाचा पक्षाला निश्चितच फायदा होईल, असा विश्वास जलसंपदा मंत्री व अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

ना. राधाकृष्ण विखे पा. यांची अहिल्यानगर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी पुनर्नियुक्ती झाल्याबद्दल विनायकराव देशमुख मित्रमंडळाच्या वतीने बुऱ्हानगर येथे देशमुख यांच्या निवासस्थानी त्यांचा कौटुंबिक सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ना. विखे पाटील बोलत होते.

यावेळी बोलताना ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, विनायकराव देशमुख यांना संघटनात्मक कामाचा मोठा अनुभव आहे त्यांचे कुशल संघटन मला परिचित असून आगामी काळात त्यांच्या संघटनात्मक अनुभवाचा पक्षाला निश्चितच फायदा होईल. आज त्यांनी आयोजित केलेल्या सत्कार समारंभाला आपण सर्व स्नेहभावनेने उपस्थित राहिलात याचा आनंद वाटतो.

यावेळी देशमुख परिवाराच्या वतीने विनायकराव देशमुख, रवींद्र देशमुख, मुकुल देशमुख व हर्षवर्धन देशमुख यांनी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या वतीने बुऱ्हाणनगरचे सरपंच रावसाहेब कर्डिले, दत्ता तापकिरे, नितीन वाघ, रंभाजी कर्डिले यांनी मंत्री महोदयांचा सत्कार केला.

याप्रसंगी अहिल्यानगर (दक्षिण) भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग,भाजपा उपाध्यक्ष बाळासाहेब सानप, पुण्यश्लोक अहिल्यादेवी आश्रमाचे मठाधिपती अण्णासाहेब बाचकर, भिंगार अर्बन बँकेचे माजी महाव्यवस्थापक पी.बी.हजारे, अजित टायर्सचे गोविंद वाघ, श्रीराम मार्बल्सचे बाळासाहेब हिंगे, सोहम कन्स्ट्रक्शनचे डि.ई.भगत (इंजिनिअर), राष्ट्रीय वीज कामगार फेडरेशनचे महासचिव प्रकाश गायकवाड, मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब काळे व विनायक गरड, संपतराव साठे, आय. एस.डी.टी. चे प्राचार्य अरुण गावडे व महेश बालटे, देवांग कोष्टी समाजाचे अध्यक्ष प्रफुल्ल लाटणे, बाणेश्वर गृहनिर्माण संस्थेचे अविनाश पावले, सुहास करंजीकर, श्रीनिवास नाबरीया, बापूसाहेब निंबाळकर, रुद्र प्रतिष्ठानचे निखिल शिंदे यांच्या सह मित्र परिवार उपस्थित होता.

# नेप्ती रोडला स्पीड ब्रेकर व साईड पट्टी कराव्यात

## अमोल कोतकर यांचे सार्वजनिक बांधकाम विभागास निवेदन



नगर – केडगाव नेप्ती रोडला अतिशय मोठ्या प्रमाणात वर्दळ असते तेथून शाळकरी मुले, नोकरदारवर्ग, ज्येष्ठ नागरिक यांची ये–जा असते. नेप्ती रोडने येणारी दुचाकी व अवजड वाहने अतिशय वेगाने वाहतूक करतात व त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे.

तरी लवकरात लवकर त्या रोडला स्पिड ब्रेकर बसवावेत व साईड पट्ट्यांचे काम पण लवकरात लवकर पूर्ण करावे अशा मागणीचे निवेदन अमोल कोतकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास दिले आहे.

# कृतीयुक्त शिक्षण विद्यार्थ्यांना भावते व शाळेत जाण्यास उत्सुकता निर्माण होते : अशोक डोळसे

नगर – लहान मुलांना चित्र काढायला, रंगवायला आणि खेळायला खूप आवडते. यातूनच त्यांचे कृतीयुक्त शिक्षण होते त्यामुळे शिक्षण हे कला क्रीडेच्या माध्यमातून अधिक विद्यार्थ्यांना भावते आणि शाळेत जाण्यासाठी ते अधिक उत्सुक होतात. आवडत्या रंगात चित्र रंगविणे, रेखोट्या काढून आवडतं चित्र रेखाटनं, छान छान नटणं, आवडत्या संगीतावर, गाण्यावर आनंदाने नृत्य करणं, स्टेजवर छान छान गाणं म्हणणं, आवडते खेळ खेळणं, यामुळे मुले शाळेत रमतात, आनंदाने अभ्यास करतात, असे प्रतिपादन अशोक डोळसे यांनी केले.

इंद्रायणी लॉनच्या प्रांगणात सनशाइन प्री प्रायमरी स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. याप्रसंगी मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे माजी अध्यक्ष विलास साठे, संस्थापक अंजुम शेख, उमेद फाउंडेशनचे प्रमुख अनिल साळवे, योगेश पिंपळे आदि उपस्थित होते.

पुढे बोलतांना डोळसे म्हणाले, ज्या शाळेमध्ये असे विद्यार्थी प्रिय वातावरण आहे तेथे विद्यार्थी अधिक तन्मयतेने शिक्षणात, शाळेत रमताना दिसतात. असे वातावरण आपल्या सनशाइन प्री प्रायमरी स्कूल मध्ये आहे. म्हणूनच इथे विद्यार्थी आणि पालकही आनंदात दिसतात.

विलास साठे यांनी मार्गदर्शन करताना पालकांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर लक्ष द्यावे. शिक्षणच त्यांना समाजात स्थान निर्माण करून देऊ शकते. शिक्षणापासून आपला पाल्य अलिप्त राहणार नाही याची दक्षता घ्यावी हे आवर्जून सांगितले.

स्वागत आणि प्रास्ताविक संस्थापक आणि मुख्याध्यापिका सौ. शहाना शेख यांनी केले. परिचय व सन्मान संस्थेच्या वतीने करण्यात आला.कलात्मक वेशभूषेत अत्यंत सुंदर असा दोन तासाहून अधिक नृत्य, गाणे आणि देशभक्तीपर गीतांचा विविध गुण दर्शनाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल, प्रमाणपत्र आणि गिफ्ट देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन सना शेख यांनी केले. आभार शिक्षिका सौ. अंजली शिंदे यांनी मानले.




सनशाइन प्री प्रायमरी स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक डोळसे, मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे माजी अध्यक्ष विलास साठे, संस्थापक अंजुम शेख, उमेद फाउंडेशनचे प्रमुख अनिल साळवे, योगेश पिंपळे

